cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–९ | शनिवार दि.२८ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### युद्ध, ऊर्जा आणि मुत्सद्देगिरीचा कस

पश्चिम आशियातील अमेरिकाइस्रायल विरुद्ध इराण या संघर्षाने केवळ त्या प्रदेशालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या भोवऱ्यात ढकलले आहे. या युद्धाचे सर्वाधिक तात्काळ परिणाम ज्या क्षेत्रावर झाले, ते म्हणजे ऊर्जा पुरवठा. होर्मुझच्या सामुद्रधुनीत निर्माण झालेल्या तणावामुळे तेल आणि नैसर्गिक वायूचा जागतिक पुरवठा विस्कळीत झाला आणि त्याचे पडसाद भारतासह अनेक देशांत उमटले.

# एफआरपीचे ६५० कोटी थकीत

## ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात,तातडीने हस्तक्षेपाची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांपुढे यंदाच्या गाळप हंगामात गंभीर आर्थिक संकट उभे ठाकले असून, साखर कारखान्यांकडून 'एफआरपी' (फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस) अंतर्गत सुमारे ६५० कोटी रुपयांची थकबाकी अद्यापही प्रलंबित आहे. मार्चअखेर पीककर्ज परतफेडीची मुदत जवळ येत असताना शेतकऱ्यांच्या हातात पैसे नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना व्याजासह थकीत रक्कम मिळवून द्यावी, अशी जोरदार मागणी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केली आहे.**

किसान सभेचे नेते डॉ. अशोक ढवळे, डॉ. अजित नवले, जे. पी. गावित, उमेश देशमुख, दीपक लिपने, सदाशिव साबळे, अमोल नाईक, अजय बुरांडे, उद्धव पौळ, कृष्णा सोळंखे, शंकर सिडाम आणि भगवान भोजने यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी बोलताना ही भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा भागात ऊस उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मात्र, यंदा साखर कारखान्यांनी उसाचे बिल वेळेत न दिल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित बिघडले आहे. उसाचे गाळप झाल्यानंतर




१४ दिवसांच्या आत एफआरपीची रक्कम देणे बंधनकारक असताना अनेक कारखान्यांनी या नियमाचे सर्रास उल्लंघन केले ▶▶ पान २ वर

### मराठवाड्यात अधिक पैसे अडकले

मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी पाणी स्थिती चांगली असल्याने ऊस उत्पादन घेतले. अनेक कारखान्यांनी मराठवाड्यातील जालना, बीड, परभणी, नांदेडसह अन्य जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे उसाचे पैसे थकवल्याने शेतकरी अडचणीत आल्याने आगीतून फुफाट्यात पडल्यासारखी स्थिती झाली आहे,'' असे डॉ. नवले म्हणाले.

# लॉकडाऊनच्या अफवा पसरवल्यास फौजदारी कारवाई

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा, पेट्रोल–डिझेलचा एक महिन्याचा साठा उपलब्ध

**मुंबई । प्रतिनिधी**

**अमेरिका–इस्त्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम आता जागतिक स्तरावर दिसू लागला आहे. कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत वाढ झाल्यामुळे बाजारपेठेत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर मध्यपूर्वेतील तणावामुळे सोशल मीडियावर लॉकडाऊनच्या अफवा वेगाने पसरत असून, त्यामुळे लहान व्यापारी आणि बाजारपेठांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. यावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्यात लॉकडाऊन लावण्यात येणार नाही. तसेच अफवा पसरवणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला.**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की फेसबुक, एक्स किंवा व्हॉट्सअॅप सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खोटी माहिती पसरवणे हा गुन्हा आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींवर कडक फौजदारी कारवाई केली जाऊ शकते. नागरिकांनी जबाबदारीने वागावे,



अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये आणि ती पुढे पाठवू नये, असे आवाहन केले. दरम्यान, केंद्र सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देत पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क (एक्साइज ड्यूटी) प्रति लिटर १० रुपयांनी कमी केले आहे. या निर्णयामुळे इंधन दरवाढीचा थेट परिणाम नागरिकांवर होणार नाही, कारण वाढीव खर्च तेल कंपन्या आणि केंद्र सरकार उचलणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि पुढे म्हणाले की, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांग्लादेश यांसारख्या देशांमध्ये इंधन टंचाईमुळे अनेक ठिकाणी जवळपास ठप्प परिस्थिती निर्माण झाली आहे, तर भारतात परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. देशात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही आणि किमान ▶▶ पान २ वर

## वीज बिलाचा भार होणार हलका एक एप्रीलपासून नवीन दर लागू

**मुंबई । प्रतिनिधी**

**ऐन उन्हाळ्यात वीज दरात कपातीचा निर्णय वीज कंपन्यांनी घेतल्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यभरात १ एप्रिलपासून नवीन दर लागू होणार आहेत.**

महावितरण, बेस्ट, अदानी आणि टाटा पॉवर या प्रमुख वीज कंपन्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला राज्य वीज नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे घरगुती वीज ग्राहकांच्या खिशावरील भार कमी होणार आहे. नवीन दरपत्रकानुसार सर्वच युनिट स्लॅबमध्ये कपात करण्यात आली. महावितरणच्या २०२५–२६ ते २०२९–३० या पाच आर्थिक वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आपला आदेश नुकताच प्रसिद्ध केला आहे. महावितरणने पाच वर्षात वीजदर कपातीसाठी मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होणार आहेत. कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत. ▶▶ पान २ वर



## मंत्री नरहरी झिरवळ यांच्यावर होणार कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांचे काही व्हिडीओ बाहेर आले असून, त्याची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. आता जे काही व्हिडीओ बाहेर आले आहेत ते गंभीर आहेत. ते व्हिडिओ खरे असतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होईलच, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. मंत्री नरहरी झिरवळ यांचा अश्लील व्हिडीओ व्हायरल झाल्याने नवा वाद निर्माण झाला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले की, जे व्हिडीओ बाहेर आले त्यांची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. यासंदर्भात मंत्री झिरवळ यांनी आपल्याशी दूरध्वनीवरून संपर्क केला असून, व्हायरल झालेला व्हिडीओ हा तीन–चार व्हिडिओ एकत्र जोडून चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्याची चौकशी व्हावी असेही ते म्हणाले. त्यावर, त्यांनी यासंदर्भात तक्रार दाखल करावी, असा सल्ला आपण त्यांना दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ▶▶ पान २ वर

## धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर नवीन रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण करा

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आदेश




**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या विकास धोरणानुसार, धाराशिव–बीड–छत्रपती संभाजी नगर यांना जोडणारा नवीन रेल्वे मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी समन्वय उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित यंत्रणा व रेल्वे विभाग यांनी एकत्रित टीम तयार करून प्रस्तावित रेल्वे मार्गाचा सर्व्हे करण्याच्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत सूचना दिल्या.

सदर प्रकल्पाच्या सर्व्हेच्या अनुषंगाने आज दिनांक २७.०३.२०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन बीड यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस रेल्वे विभागाचे अधिकारी ▶▶ पान २ वर

## युद्धाच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारच्या दोन मोठ्या घोषणा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या स्थितीचे बारकाईने निरीक्षण केले जाईल. त्यानुसार पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींचा दर पंधरवड्याला आढावा घेतला जाईल, असे केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाचे (सीबीआयसी) अध्यक्ष विवेक चतुर्वेदी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.



पेट्रोलवरील सुधारित उत्पादन शुल्क २१.९० रुपये प्रति लिटरवरून ११.९० रुपये प्रति लिटरपर्यंत कमी करण्यात आले आहे. त्यामुळे दोन सप्ताहात सरकारचा १,५०० कोटी ▶▶ पान २ वर

## आष्टी तालुक्यात कीर्तनकार श्रीहरी पुरी महाराजांच्या पत्नी व मुलाचा जळून मृत्यू !

### डंपर–कारची समोरासमोर धडक, कारने क्षणात घेतला पेट

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी–डोईठाण–अंमळनेर मार्गावरील कापशी फाट्याजवळ शुक्रवारी (दि. २७ मार्च) सकाळी घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. खडीने भरलेल्या हायवा (डंपर) आणि स्विफ्ट डिझायर कार यांच्यात झालेल्या समोरासमोरच्या जबरदस्त धडकेत कारने क्षणार्धात पेट घेतला आणि गाडीत अडकलेल्या माय–लेकरांचा जिवंत ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**बीड, दि.२७ मार्च २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५९.०० क्विंटल | १,९०२ | २,५०१ | २,२१६ |
| ज्वारी/हायब्रिड: ३२६.०० क्विंटल | २,४०० | ४,५०० | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: १२०.५० क्विंटल | २,३७१ | ४,३०१ | २,७३० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ५,४०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ४,९५१ | ५,०७१ | ५,०११ |

# महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीची स्थापना; २० कोटीची तरतूद




**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेत ''महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी'' स्थापन करण्यास मंजुरी दिली असून, या निधीसाठी प्रारंभी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे दिव्यांगांच्या हक्काधारित, सर्वसमावेशक आणि परिणामकारक सक्षमीकरणाला आर्थिक पाठबळ मिळणार असल्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.**

## सचिव तुकाराम मुंढे यांची माहिती

### जिल्हा ते राज्यस्तरीय सुसूत्र प्रक्रिया

निधीच्या विनियोगासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समित्यांकडून प्रस्ताव प्राप्त केले जातील. हे प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांच्याकडे सादर होऊन त्यांची सखोल छाननी करण्यात येईल. त्यानंतर अभिप्राय व शिफारशींसह प्रस्ताव दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत नियामक मंडळासमोर सादर केले जातील. नियामक मंडळाच्या मान्यतेनंतरच निधीचा अंतिम विनियोग करण्यात येणार असून, यामुळे निधीचा पारदर्शक, गरजाधारित आणि परिणामकारक वापर सुनिश्चित होणार आहे.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ८८ नुसार स्थापन होणारा हा निधी दिव्यांगांच्या हक्काधारित सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ देणार आहे. राज्य शासनाने दिव्यांग कल्याण विभागाची पुनर्रचना करून त्याला 'दिव्यांग सक्षमीकरण विभाग' असे स्वरूप दिले असून, कल्याणकेंद्री दृष्टिकोनाऐवजी हक्काधारित व्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली आहे. राज्य निधीच्या माध्यमातून नियमित योजनांच्या चौकटीत न बसणारे किंवा निधीअभावी अपूर्ण राहिलेले उपक्रम राबविण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. पुनर्वसन, रोजगार व उपजीविका, कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य सेवा, सहाय्यक ▶▶ पान २ वर

## अडीच वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्त्याचार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. अवघ्या दोन वर्षे पाच महिने वयाच्या चिमुरडीवर तिच्या १५ वर्षीय नातेवाईकाने लैंगिक अत्याचार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाहून आरोपीने हे कृत्य केले असून, पीडितेचा मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन अहवालातून हा प्रकार उघड झाला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील एका गावातील ही चिमुरडी १७ मार्च २०२६ रोजी घरासमोरील पाण्याच्या हौदात पडून मयत झाली होती. सुरुवातीला हा केवळ अपघात वाटत असल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करण्यातही आली होती. मात्र, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी शवविच्छेदन करताना मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निदर्शनास आणून दिले. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### विवाहित पुरुषाचे लिव्ह–इनमध्ये राहणे गुन्हा नाही

प्रयागराजः लिव्ह–इन रिलेशनशिपच्या प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. उच्च न्यायालयाने लिव्ह–इन रिलेशनशिपमध्ये राहणा–या एका जोडप्याच्या याचिकेवर सुनावणी करताना म्हटले की, एखादा विवाहित पुरुष जर एखाद्या सज्ञान व्यक्तीसोबत 'लिव्ह–इन रिलेशनशिप'मध्ये राहत असेल, तर तो गुन्हा ठरत नाही. परस्पर संमतीने असे करणे गुन्हा नाही. न्यायालयाने म्हटले की, असे केल्यास त्याच्याविरुद्ध गुन्हेगारी खटला चालवला जावा, असे होऊ शकत नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, नैतिकता आणि कायद्याला वेगळे ठेवले पाहिजे. जर कायद्यानुसार कोणताही गुन्हा घडलेला दिसत नसेल, तर नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालयाच्या कारवाईला सामाजिक मत किंवा नैतिकता मार्गदर्शन करणार नाही. न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत याचिकाकर्त्या जोडप्याच्या अटकेला स्थगिती देत पोलिसांना त्यांना अटक न करण्याचे आदेश दिले आहेत.याचिकाकर्त्यांचे वकील शहंशाह अख्तर खान यांनी सांगितले– लिव्ह–इन रिलेशनशिपच्या प्रकरणावर अलाहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

### माजी न्यायमूर्तींनाच केले मतदार यादीतून डिलीट

कोलकाताः कोलकाता उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सहिदुल्ला मुनशी यांचे नाव मतदार यादीतून डिलीट करण्यात आले आहे. कोलकाता उच्च न्यायालयाने न्यायलयीन अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यानंतरही हा प्रकार घडला आहे. मुनशी यांनी हिंदूस्तान टाईम्सशी बोलताना सांगितले की, हे खूप धक्कादायक आहे माझे नाव मतदार यादीतून डिलीट करण्यात आलं आहे. माझ्या पत्नीचे आणि माझ्या मोठ्या मुलाचे नाव अजूनही न्यायालयीन प्रक्रियेत आहे. माझा छोटा मुलगा हा आता नवमतदार आहे. त्यानं फॉर्म ६ अंतर्गत अर्ज केला होता. त्याला इपिक नंबर देखील मिळाला आहे. मुनशी हे कोलकाता उच्च न्यायालयात २०१३ ते २०२० दरम्यान जज होते. ते म्हणाले, आम्हाला सुनावणीसाठी बोलावण्यात आलं. २००२ च्या मतदार यादीत माझे आणि माझ्या पत्नीचे नाव होते. मी २००२ ची मतदार यादी, पासपोर्ट, पॅन कार्ड आणि इतर कागदपत्रे जमा केली होती. एवढंच काय देखील माझं नाव सुनावणीसाठी कसं काय आलं याचं आश्चर्य व्यक्त करत होते. त्यांनी माझे नाव क्लिअर करण्याचे आश्वासन दिलं होतं. मात्र असं असलं तरी ते वगळण्यात आलं आहे. हे कसं झालं हे मला देखील माहिती नाही.

### भाजप–काँग्रेस आमदारांमध्ये हाणामारी

श्रीनगरः जम्मू–काश्मीर विधानसभेत शुक्रवारी इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनावरून निदर्शने झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते खामेनी यांचा फोटो घेऊन सभागृहात पोहोचले आणि त्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांनी खामेनी यांचे पोस्टरही फडकवले. दरम्यान, सभागृहात काँग्रेस आणि भाजप नेत्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचा व्हीडीओही समोर आला. तथापि, हा वाद भाजप नेत्यांनी राहुल गांधींवर केलेल्या टिप्पणीवरून झाला होता. काँग्रेस आमदार इरफान हाफिज पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात घोषणाबाजी करत होते. प्रत्युत्तरादाखल भाजप आमदार युद्धवीर सेठी म्हणाले, राहुल गांधी पप्पू आहेत. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये हाणामारी सुरू झाली. तर, इराण युद्धावर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले, इराणवर हे युद्ध लादले गेले.

cmyk

## अग्रलेख

# युद्ध, ऊर्जा आणि मुत्सद्देगिरीचा कस

पश्चिम आशियातील अमेरिकाइस्त्रायल विरुद्ध इराण या संघर्षाने केवळ त्या प्रदेशालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या भोवऱ्यात ढकलले आहे. या युद्धाचे सर्वाधिक तात्काळ परिणाम ज्या क्षेत्रावर झाले, ते म्हणजे ऊर्जा पुरवठा. होर्मुझच्या सामुद्रधुनीत निर्माण झालेल्या तणावामुळे तेल आणि नैसर्गिक वायूचा जागतिक पुरवठा विस्कळीत झाला आणि त्याचे पडसाद भारतासह अनेक देशांत उमटले. भारतात एलपीजी सिलिंडरसाठी लागलेल्या रांगा आणि वाढती अस्वस्थता ही या जागतिक संकटाचीच झलक आहे.

याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून ''इंधनाची कमतरता नाही'' असे दिले जाणारे आश्वासन आणि प्रत्यक्षात दिसणारी टंचाई यातील विरोधाभास नागरिकांना खटकणारा आहे. एकीकडे सरकार साठा पुरेसा असल्याचे सांगते, तर दुसरीकडे सामान्य माणूस गॅससाठी धावपळ करताना दिसतो. या विसंगतीमुळे विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संकटात संयम आणि धैर्य राखण्याचे आवाहन केले असले, तरी केवळ आवाहन पुरेसे ठरत नाही. भारतासारख्या उदयोन्मुख महासत्तेकडून अपेक्षा केवळ अंतर्गत व्यवस्थापनाची नसून जागतिक पातळीवर सक्रिय हस्तक्षेपाची आहे. शांततेचा पुरस्कार करणाऱ्या भारताने या युद्धात मध्यस्थी करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित होते. मात्र, या बाबतीत भारताने घेतलेली सावध आणि काहीशी विलंबित भूमिका प्रश्नचिन्ह निर्माण करते. दरम्यान, पाकिस्तानने या परिस्थितीत मध्यस्थीची भूमिका घेण्याचा प्रयत्न केल्याने भू-राजकारण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. इतिहास पाहता, अमेरिकेने पाकिस्तानचा वापर 'मध्यस्थ' म्हणून अनेकदा केला आहे, हे वास्तव आहे. अशा परिस्थितीत जर या युद्धातील शांतता प्रक्रियेत पाकिस्तानला प्रमुख भूमिका मिळाली, तर त्याचे कूटनीतिक परिणाम भारतासाठी प्रतिकूल ठरू शकतात. विशेषतः अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या नेत्यांनी पाकिस्तानचे श्रेय उचलून धरण्याची शक्यता नाकारता येत नाही. संसदेत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करताना भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि ऊर्जा गरजांची पूर्तता हेच प्राधान्य असल्याचे सांगितले. ही भूमिका तात्पुरत्या दृष्टीने योग्य वाटत असली, तरी दीर्घकालीन दृष्टीकोनातून ती अपुरी आहे. कारण जागतिक संघर्षांमध्ये केवळ 'प्रेक्षक' राहणे भारतासारख्या देशाला परवडणारे नाही. विरोधकांनी उपस्थित केलेले प्रश्न विशेषतः भारताच्या उशिरा आलेल्या प्रतिक्रियेबाबत पूर्णपणे निराधार नाहीत.

ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने केंद्र सरकारने पीएनजीला प्रोत्साहन देण्याचा घेतलेला निर्णय हा धोरणात्मक बदलाचा भाग आहे. एलपीजीवरील अवलंबित्व कमी करून पाइपलाइनद्वारे नैसर्गिक वायूचा वापर वाढवणे हा योग्य दिशेने टाकलेला पाऊल म्हणता येईल. मात्र, हा बदल लोकांवर सक्तीने लादण्याऐवजी सुलभता, पायाभूत सुविधा आणि परवडणाऱ्या दरांद्वारे स्वीकारार्ह बनवणे अधिक आवश्यक आहे. अन्यथा, एलपीजी पुरवठा बंद करण्याची अट ही लोकांमध्ये नाराजी निर्माण करू शकते. या संपूर्ण घडामोडीत एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येतेजागतिक युद्धांचे परिणाम आता सीमित राहत नाहीत. त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होतो. इंधन दरवाढ, गॅस टंचाई आणि आर्थिक अस्थिरता यांचा फटका सर्वसामान्यांना बसतो.ङ्गत्यामुळे भारतासमोर आज दुहेरी आव्हान आहे. एकीकडे देशांतर्गत ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवणे, तर दुसरीकडे जागतिक पातळीवर प्रभावी मुत्सद्देगिरी दाखवणे. भारताने या दोन्ही आघाड्यांवर संतुलन साधणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी, हा संघर्ष केवळ युद्धाचा नाही, तर नेतृत्वाचा आणि विश्वासार्हतेचाही आहे. भारताने जर खऱ्या अर्थाने जागतिक नेतृत्वाची भूमिका बजावायची असेल, तर केवळ वक्तव्ये नव्हे, तर ठोस आणि वेळेवर कृती आवश्यक आहे. अन्यथा, इतर देश मध्यस्थीची संधी साधत असताना भारत मागे पडण्याचा धोका नाकारता येणार नाही.

## राजस्थानी विद्यालयात आज बीएलओ उपस्थित राहणार- नाईकवाडे

बीड । प्रतिनिधी



**निवडणूक आयोगामार्फत एस.आय. आर. कार्यक्रमांतर्गत मतदार याद्यांचे मॅपिंग करणे चालू आहे. त्यासाठी आज बीड शहरातील राजस्थानी विद्यालयांमध्ये बी.एल.ओ.ची उपस्थिती राहणार असून आपापली नावे तपासून मॅपिंग झाले आहे की नाही याची खात्री करून घ्यावी असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.**

नगरसेवक नाईकवाडे यांनी म्हटले आहे की निवडणूक आयोगामार्फत सन २००५ ची मतदार यादी सन २०२४ सोबत जुळवली जात आहे. त्या अनुषंगाने सर्व मतदारांना सूचित करण्यात येते की आज शनिवार उद्या रविवार या दोन दिवस राजस्थानी विद्यालय विप्रनगर आणि एमआयडीसी ऑफिस रामतीर्थ या बुचवर आपण मतदान केले आहे. तिथे बीएलओ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी या ठिकाणी येऊन बीएलओ अधिकाऱ्याकडे याद्या तपासून आपली मॅपिंग झाली आहे का नाही हे पहावे. नसेल झाली तर तात्काळ करून घेणे अत्यावश्यक आहे. प्रत्येकाने येताना स्वतःचे मतदान कार्ड सोबत घेऊन यावे. हा कार्यक्रम सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत चालणार असल्याची माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे व रामदास सरवदे यांनी दिली आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद महात्मा गांधी अध्ययन केंद्र अंबाजोगाई चा उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**दिनांक २८ मार्च २०२६ रोजी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय संचलित महात्मा गांधी अध्ययन केंद्र, ज्ञानगंगोत्री एज्युकेशन सोसायटी, अंबाजोगाई महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धांत आणि व्यवहार या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आंतरविद्याशाखीय आयोजन करण्यात आले आहे.**

योगेश्वरी शिक्षण संस्था परिसरातील नागापूरकर सभागृहात ही परिषद संपन्न होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. चंद्रशेखर बर्दापूरकर व उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष मा. डॉ. सुरेश खुरसाळे, माजी अध्यक्ष



योगेश्वरी शिक्षण संस्था भूषविणार आहेत. या परिषदेचे बीजभाषक प्रोफेसर डॉ. दिलीप चव्हाण, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड हे उपस्थित राहणार आहेत. या आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेत इंडोनेशिया, मेक्सिको, नेपाळ येथील तज्ञ मार्गदर्शक सहभागी होत आहेत. एकूण १३० शोधनिबंध विविध विषयावर प्राप्त झाले आहेत. आय एस एस एन जर्नल न्यू मॅन पब्लिकेशन ठाणेच्या वतीने हे शोध निबंध दिनांक २८ मार्च रोजी प्रकाशित करण्यात येणार आहेत. स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ संपन्न होणार आहे. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.प्रोफेसर डॉ. रोहिदास नितोंडे तर योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव मा.श्री. कमलाकर राव चौसाळकर यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन स्वामीरामान तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य व या परिषदेचे मुख्य आयोजक डॉ.प्रशांत देशमुख, डॉ. रमेश सोनटक्के, ज्ञानगंगोत्री एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व या परिषदेचे संयोजक डॉ. आत्माराम गंगणे, महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी परभणीचे सचिव तथा न्यू मॅन पब्लिकेशनचे मुख्य संपादक डॉ. कल्याण गांगर्डे, महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या संचालक व या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समन्वयक डॉ.शैलजा बरुरे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख रमेश सोनवळकर, डॉ. बी. के. भाबरदोडे यांनी केले आहे.

### उपक्रमशील महात्मा गांधी अध्ययन केंद्र

योगेश्वरी शिक्षण संस्थेचे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय संचलित व विद्यापीठ अनुदान आहे पुरस्कृत महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या वतीने आत्तापर्यंत सहा राज्यस्तरीय परिषद, तीन राष्ट्रीय परिषद व २८ मार्च २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केलेल्या आहेत. जागर लोकशाहीचा आपल्या सर्वांचा हा परिसरातील हा जनसहभाग व लोकशाही मूल्य संवर्धित करणारा उपक्रम दरवर्षी २२ ते ३० जानेवारी या दरम्यान राबविण्यात येतो. सावित्री उत्सव, महात्मा गांधी बाबांची यात्रा भरवणाऱ्या उजेड गावी अंबाजोगाई करांची शैक्षणिक सहल, सफाई कामगार कृतज्ञता महोत्सव, आरक्षण परिषद, हमाल मापाडी परिषद, आंतरजातीय आंतरधर्मीय विवाहितांचा मेळावा, व्यंगचित्र प्रदर्शन, महात्मा गांधी यांच्या जीवनावरील पुस्तकांचे प्रदर्शन, महात्मा गांधी व्याख्यानमाला, राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला इत्यादींचे यशस्वी आयोजन केले आहे, अशी माहिती महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या संचालिका प्रोफेसर डॉ. शैलजा बरुरे यांनी दिली.

## तलव्यात अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

परतूर । प्रतिनिधी

**मंठा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पाटोदा शेत शिवारात असलेल्या निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्यामध्ये एका ४० ते ५० वर्षे वयोगटातील अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. ही घटना गुरुवार, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास उघडकीस आली.**

पाटोदा शिवारातील कालव्यामध्ये एक मृतदेह तरंगताना स्थानिक नागरिकांना दिसून आला. याची माहिती मिळताच मंठा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून, अद्याप या व्यक्तीची ओळख पटलेली नाही. तसेच वय अंदाजे ४० ते ५० वर्षे उंची: १६५ सें.मी.बांधा: मध्यम रंग: सावळा केस: काळे-पांढरे (पिकलेले) ओळख चिन्हे: गळ्यामध्ये काळा दोरा, तुळशीची माळ आणि कमरेला लाल रंगाचा करदोडा (दोरा).परिधान केलेले कपडे: अंगावर केवळ 'माचो' कंपनीची विटकरी रंगाची अंडरवेअर आहे. तसेच कमरेच्या लाल करदोड्याला 'नाचकन' लटकवलेले आहे. तसेच वरील वर्णनाचा कोणताही इसम बेपत्ता असल्यास किंवा कोणास या मृतदेहाबाबत माहिती असल्यास त्यांनी मंठा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पेट्रोल-डिझेल पुरवठा सुरळीत विक्रीवरील मर्यादा रद्द-सविता चौधर

जालना । प्रतिनिधी

**जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (पुरवठा विभाग) यांनी इंधन विक्रीवरील पूर्वीचे निर्बंध रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी २७ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, सोशल मिडियावर पसरलेल्या अफवांमुळे पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत होती. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये काही काळ समस्या निर्माण झाली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन २५ मार्च, २०२६ रोजी पेट्रोल व डिझेल विक्रीवर काही मर्यादा घालण्यात आल्या होत्या. मात्र, सद्यस्थितीत जिल्ह्यातील सर्वच कंपन्यांकडून पुरेसा इंधन साठा उपलब्ध झाल्याने आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली आहे. त्यामुळे इंधन वितरणावर निर्बंध ठेवण्याची गरज उरलेली नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. यामुळे २५ मार्च रोजी जारी करण्यात आलेला पेट्रोल-डिझेल विक्रीवरील मर्यादेचा आदेश तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक तेवढेच इंधन घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. दरम्यान, या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पोलिस विभाग, तहसीलदार, तेल कंपन्यांचे अधिकारी तसेच पेट्रोल पंप चालकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

## महानगरपालिकाची प्रतिबंधित प्लास्टिकविरोधी मोठी कारवाई १० क्विंटल प्लास्टिक जप्त

जालना । प्रतिनिधी

**जालना शहराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आपली मोहीम अधिक तीव्र केली असून, आज दि. २७ मार्च रोजी शहरातील नवीन मोंढा परिसरात मोठी धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत महानगरपालिकेचया स्वच्छता पथकाने सुमारे १० क्विंटल प्रतिबंधित सिंगल युज प्लास्टिक जप्त केले असून, संबंधित दुकानदारांकडून ३०,००० रुपयांचा दंड वसूल केला आहे.**



महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरीक्षकांनी एकत्रितपणे नवीन मोंढा बाजारपेठेत ही शोधमोहीम राबवली. यामध्ये श्री. पारसमल मोहनलाल जैन, महालक्ष्मी ट्रेडर्स प्रतिष्ठानांकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा मोठा साठा आढळून आला. शासनाने प्रतिबंधित केलेले सिंगल युज प्लास्टिक बाळगणे आणि त्याची विक्री करणे या कारणास्तव ही दंडात्मक कारवाई करण्यात आली. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार, १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरी बॅग्ज तसेच सिंगल युज प्लास्टिकच्या वस्तू वापरणे, बाळगणे आणि विक्री करणे हा कायदेशीर गुन्हा आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी ही बंदी घालण्यात आली असून, जालना महानगरपालिकेमार्फत यापुढेही अशी जप्तीची मोहीम अधिक कठोरपणे राबवण्यात येणार आहे. ''शहरातील सर्व व्यापारी, विक्रेते आणि नागरिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही मोठी दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे आवाहन महानगरपालिकाचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### एफआरपीचे ६५०

आहे. संघटनांच्या मते, थकबाकीदार कारखान्यांवर साखर आयुक्तांनी 'आरआरसी' अंतर्गत तातडीने कारवाई करून संबंधित कारखान्यांचा साखर साठा जप्त करावा आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांची थकबाकी वसूल करावी. अन्यथा सरकारनेच थकीत ऊस बिलाची जबाबदारी स्वीकारून साखर निर्यात, निर्यात अनुदान यांसारख्या उपाययोजनांद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळवून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.ङ्गयाशिवाय, केवळ चालू हंगामातील नव्हे तर २०२४-२५ या मागील हंगामातील एफआरपीची थकबाकी देखील व्याजासह देण्यात यावी, अशीही भूमिका संघटनांनी घेतली आहे. येत्या काही दिवसांत थकीत रक्कम न मिळाल्यास साखर कारखान्यांच्या प्रवेशद्वारांवर तसेच साखर आयुक्त कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, कोल्हापूर विभागातील काही कारखान्यांनी २०२३-२४ हंगामात उसाला प्रतिटन २९५० रुपये दर दिला होता. मात्र, यावर्षी सांगली जिल्ह्यातील दिघंची (ता. आटपाडी) परिसरातील सुमारे ७० ते ८० शेतकऱ्यांना केवळ २१०० रुपये दर देण्यात आल्याची तक्रार पुढे आली आहे. या संदर्भात साखर सहसंचालकांकडे तक्रार नोंदविण्यात आल्याची माहिती डॉ. अजित नवले यांनी दिली. एकूणच, एफआरपी थकबाकीचा प्रश्न गंभीर बनला असून, वेळेत निर्णय न घेतल्यास राज्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

----------

### लॉकडाऊनच्या अफवा पसरवल्यास

एक महिन्याचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा विश्वास व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरिकांना आवाहन केले की, घाबरून पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये किंवा गरजेपेक्षा जास्त इंधन खरेदी करू नये. असे केल्यास मागणी-पुरवठ्यावर अनावश्यक ताण येतो आणि कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ शकतो. तसेच, कमर्शियल गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात वाढ करण्याचा निर्णय ही घेण्यात आला आहे. जो पुरवठा काही काळ २० टक्क्यांपर्यंत घटला होता, तो आता ४० टक्क्यांवर वाढवण्यात आला असून, पुढे तो ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे नियोजन आहे. भारत सरकारची प्रभावी कूटनीती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्तक्षेपामुळे येत्या काळात परिस्थिती आणखी सुरळीत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

----------

### युद्धाच्या पार्श्वभूमीवर मोदी

रुपयांचा महसूल घटेल, असा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती १०० डॉलर प्रतिबॅरलवर गेल्या आहेत. अगदी बॅरलमागे ११९ डॉलरवर तेलदराने झेप घेतली होती. त्यापार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेट्रोलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क ३ रुपये प्रतिलिटर आणि डिझेलवरील शुल्क रद्द केले आहे. दोन्हीमिळून १० रुपयांची शुल्क कपात केल्याचे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या आहेत. त्यामुळे तेल कंपन्यांचे नुकसान होत आहे. या वाढत्या किमतीपासून कंपन्यांचे संरक्षण करण्यासाठी शुल्क कपात करण्यात आली आहे. नायरा एनर्जीने पेट्रोलच्या भावात प्रतिलिटर पाच आणि डिझेलच्या भावात तीन रुपयांनी वाढ केली आहे. गेले काही आठवडे सातत्याने वाढत्या किमतीचा भार कंपन्या सहन करत आहेत. दरम्यान सरकारने ६० दिवस पुरेल इतका इंधनसाठा असल्याचे गुरुवारी जाहीर केले आहे. इंधनाची कोणतीही टंचाई नाही. चुकीची माहिती पसरवली जात असल्याने काही ठिकाणी भीतीपोटी गर्दी झाल्याचा दावा सरकारने केला आहे. लोहखनिज आणि कोक कोल यांसारख्या स्टील निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालासाठी भारत अर्जेंटिना, इंडोनेशिया आणि ओमानशी पुढील महिन्यात चर्चा करणार आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या ग्लोबल स्टील परिषदेत ही चर्चा होईल. चीननंतर भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा कच्च्या पोलादाचा निर्माता आहे. इंडोनेशियामध्ये जगातील सर्वात मोठा निकेलचा साठा आहे. स्टेनलेस स्टीलच्या निर्मितीसाठी कच्चा माल म्हणून निकेलची आवश्यकता आहे. तर, ब्राझिल आणि ओमानमधून मोठ्या प्रमाणावर लोहखनिज आणण्याचा विचार आहे. त्यासाठी सरकारने गेल्या महिन्यात खनिज उत्खननाबाबत करार केला आहे. देशांतर्गत वाढती स्टीलची मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. तर, लिथियमसह विविध दुर्मिळ खनिजांसाठी अर्जेंटिनाची मदत घेतली जाणार आहे. अर्जेंटिना हा जगातील चौथ्या क्रमांकाचा लिथियमचा उत्पादक आहे. इलेक्ट्रिक वाहने आणि अक्षय ऊर्जेसाठी लिथियमची आवश्यकता आहे.

----------

### धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर

व इतर अधिकारी उपस्थित होते. प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी बीड जिल्ह्यातील केज, बीड व गेवराई तालुक्यातील काही गावांमधील खाजगी जमीन संपादित होणार आहे. तसेच प्रस्तावित रेल्वे मार्गावर काही ठिकाणी वनविभागाची जमीन आहे, काही ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग व कॅनॉल मध्ये संपादित होणाऱ्या क्षेत्राचा समावेश आहे. त्याबाबत सर्व विभागांच्या ना हरकत प्रमाणपत्र संबंधाने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. भारत सरकारच्या विकास धोरणानुसार, धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर यांना जोडणारा नवीन रेल्वे मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. हा प्रकल्प प्रादेशिक आणि आर्थिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या मार्गामुळे स्थानिक नागरिकांना जलद आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध होईल. औद्योगिक व व्यावसायिक कनेक्टिव्हिटी सुधारेल, त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. शिक्षण, आरोग्य सुविधा आणि सामाजिक विकासासाठी ग्रामीण व शहर भागांमध्ये सुलभ संपर्क सुनिश्चित होईल.

-----------

### आष्टी तालुक्यात कीर्तनकार श्रीहरी पुरी

पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधिक्षक ऋषिकेश शिंदे यांच्याकडे मार्गदर्शनाखाली तातडीने सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले आणि त्यांच्या पथकाने अत्यंत गोपनीयरीत्या माहिती गोळा केली. पीडितेच्या मृत्यूनंतर संशयित आरोपी असलेला तिच्या आत्याचा मुलगा (वय १५ वर्षे ०५ महिने) हा तीन दिवस जेवला नव्हता आणि सतत रडत होता, अशी माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारांकडून मिळाली. या संशयावरून पोलिसांनी त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पीडितेच्या मृत्यूपूर्वी आठ दिवस अगोदर आरोपीने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या दुचाकीवर बसवून नेले आणि घरात कोणी नसताना मोबाईलवरील अश्लील चित्रफीत पाहून तिच्यावर अत्याचार केल्याची कबुली दिली. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४(१) आणि बालकांचे लैंगिक शोषण कलम ६४(१) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम २०१२ च्या कलम ४,६, ८आणि १२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी स्वतः सरकारतर्फे फिर्यादी होऊन एका गुंतागुंतीच्या गुन्ह्याचा छडा लावला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पिंक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधवर यांच्याकडे सोपवण्यात आला असून, या घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

-------------

### आष्टी तालुक्यात कीर्तनकार

जळून दुर्दैवी अंत झाला. या हृदयद्रावक घटनेत सौ. पुष्पा श्रीहरी पुरी (वय ५०) आणि ऋषिकेश श्रीहरी पुरी (वय २६) यांचा जागीच मृत्यू झाला. एका क्षणात हसतं-खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जेष्ठ कीर्तनकार व ग्रामसेवक ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांच्या कुटुंबातील सदस्य १३ व्या विधीसाठी मूळगाव साळेगाव (ता. केज) येथे जात होते. याच दरम्यान कापशी फाट्याजवळ समोरून येणाऱ्या खडीने भरलेल्या टिप्पर (क्र. एमएच-१६ सीडी-७३०५) आणि त्यांच्या कारची भीषण धडक झाली. धडक इतकी जोरदार होती की, कारने काही क्षणांतच आगीचा भडका उडवला. आगीच्या रौद्ररूपामुळे गाडीत अडकलेल्या माय-लेकरांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. घटनास्थळी धाव घेतलेल्या नागरिकांनी आगीवर नियंत्रण मिळवून दोघांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र आगीच्या ज्वाळांपुढे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.ङ्गअपघाताची माहिती मिळताच पोलीस, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अध्यात्म क्षेत्रातील कीर्तनकार, प्रवचनकार व भाविकांकडून पुरी कुटुंबियांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. या दुर्दैवी घटनेने आष्टी शहरात तर नव्हे तर तालुक्यामध्ये शोककळा पसरली.

------------

### महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीची

साधनांची उपलब्धता तसेच समुदायाधारित समावेशक विकास या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या निधीसाठी राज्य शासनाकडून २० कोटी रुपयांची प्रारंभिक तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय व्यावसायिक सामाजिक दायित्व (सीएसआर) देणग्या, अनुदान तसेच इतर विविध स्रोतांमधून प्राप्त होणारा निधीही या निधीत समाविष्ट केला जाणार आहे. विशेषतः सीएसआरच्या माध्यमातून अतिरिक्त निधी उभारण्यावर विभागाचा भर राहणार आहे. निधीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (दिव्यांग सक्षमीकरण) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या मंडळात वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील, तर आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण हे सदस्य-सचिव म्हणून निधीचे कार्यभार पाहतील.

------------

### मंत्री नरहरी झिरवळ

या व्हिडिओची शहानिशा करण्यात येईल, असे सांगतानाच सध्या जी परिस्थिती समोर आली आहे. त्यानंतर या व्हिडीओची सत्यता काय आहे, ती पडताळून पाहिली जाईल. त्यानंतर, त्यांच्या पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार आणि आम्ही मिळून योग्य निर्णय करू. मात्र, आता जे काही व्हिडिओ समोर आले आहेत ते गंभीर आहेत. त्यामुळे त्याची सत्यता पडताळणे अत्यंत गरजेचे आहे. आणि ते जर सत्य असतील तर त्याच्यावर योग्य ते कारवाई होईलच, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २८ मार्च २०२६


## थोडक्यात

### किर्ती नवनाथ सरवदे यांना रसायनशास्त्रात पीएचडी प्रदान

बीड । प्रतिनिधी

बीड येथील किर्ती नवनाथ सरवदे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून रसायनशास्त्र विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. किर्ती सरवदे यांची शैक्षणिक वाटचाल उल्लेखनीय असून त्यांनी रसायनशास्त्र विषयात SET, NET आणि G-TE या महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केले आहे.



प्रा. डॉ. एस. व्ही. ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी Synthesis, Characterization and Biological Studies of Transition Metal Complexes of Novel Schiff Base Ligands या विषयावर संशोधन करून शोधप्रबंध सादर केला. त्यांच्या संशोधनकार्याची दखल राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून विविध संशोधन जर्नल्समध्ये त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत.

संशोधन काळात किर्ती सरवदे यांनी डेश्ररी झुेशीशव चळपळ डरलीरीी उहळश्रश्रशी या अभिनव संकल्पनेवर डिझाइन पेटंटही प्राप्त केले आहे, जे त्यांच्या संशोधनातील नाविन्यपूर्णतेचे द्योतक आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून-नातेवाईक, मित्रपरिवार तसेच शैक्षणिक क्षेत्रातून-त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.




### बीडमध्ये श्रीराम नवमीनिमित्त शोभायात्रा; मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आरती

बीड । प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या कंकालेश्वर मंदिरात श्रीराम नवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव उत्साहात गुरुवारी (दि.२६) साजरा करण्यात आला. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर कंकालेश्वर मंदिर परिसर 'जय श्रीराम'च्या घोषणांनी दुमदुमून गेला.

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त मंदिरात विविध धार्मिक विधी पार पडले. आरतीनंतर पंकजाताई मुंडे यांनी प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले व उपस्थितांना राम नवमीच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कंकालेश्वर मंदिरातून भव्य शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. या शोभायात्रेला नागरिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून हजारो रामभक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला. 'जय श्रीराम, जय जय श्रीराम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला. महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली. संपूर्ण कार्यक्रमात भक्तीभाव, शिस्त आणि उत्साह यांचे सुंदर दर्शन घडले. यावेळी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, स्वप्नील गलधर, आदित्य सारडा, नगरसेविका डॉ.सारिका क्षीरसागर, भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा, चंद्रकांत नवले, संतोष हंगे, परशुराम गुरखुदे, सांगिता धसे, डॉ.अभय वनवे, संग्राम बांगर यांच्यासह सर्व पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि श्रीरामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दुचाकी रॅलीने वेधले लक्ष**

'तुम्ही आम्ही बीडकर' यांच्या वतीने प्रभू श्रीराम नवमीनिमित्त बार्शी नाका येथील गणपती मंदिरातून भव्य दुचाकी रॅलीचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. संपूर्ण शहर श्रीराममय झाले होते.

## माझ्या कातड्याचे जोडे केले तरी तुमचे प्रेम फेडू शकणार नाही

### भायाळाच्या नारळी सप्ताहात ना.पंकजाताई मुंडेंनी पदराने काढली जनतेच्या प्रेमाची दृष्ट

**पाटोदा । प्रतिनिधी**

गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरु देणार नाही, मी ही शपथ चितेवर खाल्ली आहे. गोपीनाथ मुंडे या नावाच्या संस्कारावर तुमचा किती विश्वास आहे. तुम्ही किती रे प्रेम करता माझ्यावर.. याची कशी परतफेड करू. माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायात घातले तरी ही फेड होणार नाही, अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी भायाळा येथे आपल्या भावना व्यक्त केल्या.

भायाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या महामंडलेश्वर त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज गणेशानंद गडाच्या नारळी सप्ताह आणि नामजप यज्ञ सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे काल संध्याकाळी भेट दिली, त्यावेळी त्या बोलत होत्या. ह.भ.प. राधाताई सानप, गणेशानंद गडाचे मठाधिपती विक्रमानंद शास्त्री महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्त यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, गोपीनाथ मुंडे या नावाच्या संस्कारावर किती विश्वास आहे. लोकसभेत पराभव झाल्यानंतर माझ्या भावांनी आत्महत्या केल्या, इतकं प्रेम तुम्ही मला दिलं. माझ्या कातड्याचे जोडे केले आणि तुमच्या पायात घातले तरीही परतफेड होणार नाही. लोकनेते गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरु देणार नाही, मी ही शपथ चितेवर खाल्ली आहे. त्यामुळे वंचित, उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी आयुष्यभर आपण काम करत



राहील. जनतेचे आपल्याला भरपूर प्रेम मिळालेले आहे. हे नातं जगातलं विलक्षण अशा प्रकारचे नाते आहे.गोपीनाथ मुंडे होणं सोपी गोष्ट नाही, त्यासाठी मखमली रस्त्यावरची वाटचाल नाही तर काटेरी खडतर मार्गाने राबराब राबणे आवश्यक असते. जनता जनार्दन मला इतके प्रेम देते की, माझ्या कातड्याचे जोडे करून जरी घातले तरी ते ऋण फिटणार नाही. त्यामुळे मला सातत्याने या प्रेमाला मी कसे उतराई होऊ असा प्रश्न पडत आलेला आहे. मुंडे साहेबांचा विचार आणि वारसा जपत वाटचाल करत असताना मनात कोणताही स्वार्थ न ठेवता श्वासात श्वास असेपर्यंत या वंचित उपेक्षित घटकांचे कल्याण कसे होईल यासाठी मी रात्रंदिवस प्रयत्न करत आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांमुळेच मी आज इथपर्यंत आहोत. समाजातील वंचित, अपेक्षित घटकांचे जीवन कष्टमुक्त व्हावे यासाठी मुंडे साहेबांनी आयुष्यभर काम केले, त्याच मार्गावरून मुंडे साहेबांना अपेक्षित कार्य करून जनतेच्या या निरपेक्ष प्रेमातून उतराई होण्याचा आपण प्रयत्न करू असे सांगत सगळे प्रेमाने राहा एकजुटीने राहा एकमेकांचा हात धरून रहा, असे आवाहन उपस्थित भाविकांना केले.

अभूतपूर्व जंगी स्वागत ; जनतेच्या प्रेमाची पदराने काढली दृष्ट

यावेळी ग्रामस्थांनी पंकजाताई मुंडे यांचे अत्यंत आपुलकीने अभूतपूर्व असे जल्लोषात स्वागत केले. गावची वेस ते कार्यक्रम स्थळापर्यंत सजवलेल्या रथावरून, जेसीबीतून पुष्पवर्षाव करत त्यांची मिरवणूक काढली. आबाल वृद्धापासून महिलांपर्यंत अतिशय जल्लोषात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. हे स्वागत इतके अविस्मरणीय होते की, पंकजाताई मुंडे भारावून गेल्या. जाहीर कार्यक्रमात याचा उल्लेख करत व्यासपीठावरून त्यांनी उपस्थित जनता जनार्दनाची स्वतः दृष्ट काढली.

पंकजाताई गणेशानंद गडाच्या भगिनी - विक्रमानंद महाराजांनी केला सन्मान

गणेशानंद गडाचे मठाधिपती विक्रमानंद महाराज यांनी यावेळी भावना व्यक्त करताना पंकजाताई हया एका गडाच्या कन्या आहेत, त्यामुळे मी लेक म्हणणार नाही पण आता त्या आमच्या गणेशानंद गडाच्या भगिनी असतील. त्यांचे राजकीय भविष्य उज्ज्वल आहे, त्या मोठया पदापर्यंत नक्की पोहोचतील असा आशीर्वाद दिला.

## सौताडा येथे हरिनाम सप्ताहात राधाताई महाराजांचे काल्याचे कीर्तन; श्रीकृष्ण लीलांचे रसाळ वर्णन

पाटोदा । प्रतिनिधी

श्री राम जन्मोत्सवानिमित्त सौताडा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात आज ह.भ.प. राधाताई महाराज यांचे काल्याचे कीर्तन भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कीर्तनासाठी परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावून भक्तिरसाचा आस्वाद घेतला.

कीर्तनामध्ये राधाताई महाराज यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा अर्थ अत्यंत प्रभावी व सोप्या भाषेत स्पष्ट केला.

गोकुळीच्या सुखा, अंतपार नाही लेखा या अभंगातून गोकुळातील आनंदाचे वर्णन करताना त्यांनी सांगितले की, भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांनी संपूर्ण गोकुळ



आनंदाने न्हाऊन निघाले होते. नंदाच्या घरी जन्मलेल्या बाळकृष्णामुळे प्रत्येकाच्या जीवनात आनंद, उत्साह आणि समाधान निर्माण झाले.

महाराजांनी पुढे स्पष्ट केले की, श्रीकृष्णाच्या लीलांमध्ये केवळ दैवी शक्तीच नव्हे, तर मानवी जीवनासाठी उपयुक्त असे अनेक संदेश दडलेले आहेत. बालकृष्णाने केलेल्या खोड्या, गवळ्यांसोबत खेळलेले खेळ, आणि काल्याच्या माध्यमातून दाखवलेली एकजूट व आनंद वाटण्याची भावना ही जीवनातील महत्त्वाची मूल्ये आहेत.

काल्याच्या प्रसंगाचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, श्रीकृष्णाने आपल्या सवंगड्यांना एकत्र आणून आनंद साजरा केला, ज्यातून एकोप्याचे आणि सामूहिक जीवनाचे महत्त्व अधोरेखित होते. तसेच, जीवनात आनंदी राहण्यासाठी साधेपणा, प्रेम आणि भक्ती आवश्यक असल्याचा संदेश त्यांनी दिला. या कीर्तनादरम्यान गुढी, तोरणे, भजन-कीर्तन आणि अभंगगायन यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. कार्यक्रमाच्या शेवटी राधाताई महाराज यांनी सौताडा ग्रामस्थांनी अशा धार्मिक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा हरिनाम सप्ताह भाविकांसाठी अध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरत असून, अशा उपक्रमांमुळे समाजात भक्ती, संस्कार आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

## आष्टी विधानसभा प्रमुखपदी गणेश नाना शिंदे; धस समर्थकाला मोठी जबाबदारी

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील चिखली येथील युवा नेते व आमदार सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेले गणेश नाना शिंदे यांची भारतीय जनता पार्टीकडून आष्टी विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या दीर्घकालीन कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.**

गणेश शिंदे हे गेल्या तब्बल २५ वर्षांपासून आमदार सुरेश आण्णा धस यांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. प्रत्येक निवडणुकीत जीवाचे रान करून पक्षासाठी काम करणारा, मतदारांच्या सुखदुःखात धावून जाणारा आणि कार्यकर्त्यांना एकत्र



ठेवणारा असा त्यांचा ठसा राहिला आहे.

त्यांच्या या कामगिरीची दखल घेत आमदार सुरेश आण्णा धस व भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांची विधानसभा प्रमुखपदी निवड करत विश्वास व्यक्त केला आहे. या नियुक्तीमुळे आष्टी तालुक्यासह संपूर्ण विधानसभा मतदारसंघात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निवडीचे स्वागत आष्टीचे नगराध्यक्ष जियाभाई बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, शैलेश सहस्रबुद्धे, उपनगराध्यक्ष, सरपंच अशोक मुळे, जामखेडचे नगरसेवक गणेश डोंगरे, नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव तसेच विविध स्तरातील कार्यकर्ते व नागरिकांनी केले आहे.

दरम्यान, गणेश शिंदे यांनी प्रतिनिधींशी संवाद साधताना सांगितले की, पक्षाने व आमदार सुरेश आण्णा धस यांनी माझ्यावर टाकलेला विश्वास मी नक्कीच सार्थ ठरवेन. पक्षवाढ आणि धस साहेबांचा नावलौकिक वाढवण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करणार आहे.

## आपल्या कर्तव्याशी इमान असणारे महावितरणचे अमृतराजे आजबे जिजाऊ पुरस्कारांनी सन्मानित

आष्टी । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड व तहानुभाई बिरजे यांच्या नावाने २०२६ ला दिलेल्या पुरस्कारामध्ये आष्टी महावितरण मध्ये कर्तव्याशी इमान राखून सेवा देणारे आष्टी महावितरण चे कर्तव्यदक्ष महावितरणचे कर्मचारी अमृत आजबे यांच्या सेवा कालावर व त्यांनी वेळोवेळी आपली जीवाची परवा न करता महावितरण मध्ये जिथे कुठे लाईटचा पर्सन निर्माण होईल त्या ठिकाणी अमृत राजे हे आपले कर्तव्य पार पाडत महावितरण ची सेवा येत आहेत याच त्यांच्या कर्तव्याचा आलेख पाहता मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष तान्हाजी बापू जंजिरे, यांनी यंदाचा जिजाऊ महावितरण चा शिलेदार अशा नावाने दिला गेलेला पुरस्कारासाठी अमृत राजे यांना सन्मानित केले या



कार्यक्रमास महानंद मुंबईचे संचालिका आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्या अध्यक्षतेखाली बीड सांगवी येथे हा कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमास मराठा सेवा संघ कर्मचारी सदस्य गावकरी तसेच या कार्यक्रमाचे मुख्य व्यवस्थापक ज्येष्ठ पत्रकार सिताराम भाई पोकळे तसेच या पुरस्कारामध्ये कर्तव्यदक्ष पत्रकार म्हणून पत्रकार उत्तमराव बोडखे, शरद रेडेकर अविनाश कदम अतुल जवणे अण्णा साबळे तसेच समाज रत्न म्हणून गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर समाजसेवक पर्यंत परीवंत गायकवाड यांना व त्यांच्या पत्नी कर्तव्यदक्ष सरपंच म्हणून वंदनाताई गायकवाड यांना सन्मानित करण्यात आले या सोहळ्यास मराठा सेवा संघाचे लक्ष्मण रेडेकर सर बन्सीधर मोरे बापू एडवोकेट गव्हाणे साहेब तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तळेकर सर व दिनेश पोकळे सर यांनी आपल्या बहारदार सूत्रसंचालनामध्ये केले सर्व पुरस्कर त्यांना प्राजक्ताताई धस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## आत्मविस्मृत हिंदू समाज जागृत होणे गरजेचे, जातीपातीच्या षडयंत्राचे बळी ठरू नका-अंबादास अंभोरे

आष्टी । प्रतिनिधी

हिंदू समाजाला आत्म विस्मृतीमुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले आहे हिंदू बहुसंख्य आहेत म्हणून भारत देश सुरक्षित आहे हिंदू धर्माच्या विद्वत्ते पुढे विश्व नतमस्तक झाले आहे हिंदू धर्मासाठी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांच्यापर्यंत अनेक महापुरुषांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून गुलामी आणि पारतंत्र्याविरुद्ध लढा दिला त्यामुळे यापुढे हिंदूंनी जागृत होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन देवगिरी प्रांत हिंदू जागरण मंचाचे अध्यक्ष अंबादास अंभोरे यांनी केले तर..

हिंदू धर्म हा पुरातन आणि प्राचीन असून महान परंपरा लाभलेला धर्म आहे आज आपण हिंदू धर्म जागरणाच्या बाता मारतो परंतु आपण हिंदू संस्कृती प्रमाणे न वागता आपण बेफाम झालो आहोत आपण सर्वजण पैशाच्या मागे लागलो आहोत हिंदू धर्मातील लोक सुधारले नाही तर आपणावर फार वाईट वेळ येणार आहे त्यामुळे हिंदू संस्कृतीची उजळणी करण्याची वेळ आली असून त्याप्रमाणे युवा पिढीने स्वतःला घडवावे असे आवाहन भारत भूषण पुरस्कार विजेत्या महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी कीर्तनकार गुरुवर्य समाधान माय महाराज श्रीगोंदेकर यांनी केले आष्टी येथे आयोजित केलेल्या विराट हिंदू संमेलनामध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते

यावेळी व्यासपीठावर हरिभक्त परायण नीळकंठ महाराज तावरे, हरिभक्त परायण अशोक महाराज गोविंदगड आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी हरिभक्त परायण रामदास महाराज डोरले हे होते

पुढे बोलताना अंबादास अंभोरे म्हणाले की, हिंदू समाज हा हिंदू असल्याचे विसरत चालला असून हिंदू धर्म जातीपाती मध्ये वाटत चालला असून प्रादेशिकता वाद देखील जाणीवपूर्वक वाढविण्यात येत आहे हिंदू समाज हा एकत्रित होत आहे किंवा नाही यासाठी चाचण्या सुरू असून हिंदू मुलींना लव जिहाद मध्ये फसवण्याचे मोठे कारस्थान देशभर सुरू आहे त्यासाठी हिंदू जागरण मंचातर्फे महिला सुरक्षा अभियान सुरू असून समाजाने एकत्र येण्याची आवश्यकता आहे काही लोकांची या देशावर निष्ठा नसून त्यांचा देशाला काहीही फायदा नाही हिंदू समाजाच्या सहिष्णुतेचा गैरफायदा घेतला जात असून हिंदू मुलींना पळवून नेऊन त्याचे समर्थन करणारे टोळक्याने जमा होतात परंतु हिंदू समाजामध्ये एकी नसल्यामुळे या अप्रिय घटना घडत आहेत त्यामुळे यापुढे हिंदू मुलींना पळवण्याच्या घटना झाल्यास पोलिसांकडे जाऊन तक्रार करण्यापेक्षा ज्याने पळून नेले आहे त्याच्या घरी जाऊन त्याला जाब विचारण्याची वेळ आली आहे

ग्रामीण भागामध्ये प्रत्येक महापुरुषाची जयंती संपूर्ण हिंदू समाजाने एकत्रित येऊन साजरी करावी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांनी १३५ वर्षांपूर्वी वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला परंतु त्यांनी पैशाच्या मागे न लागता सर्वस्वाचा त्याग करून मी केवळ देशासाठी जगणार आहे असा संकल्प केल्यामुळे




आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जगभर विस्तार झाला असून हिंदू समाजात एकता आणि संघटन वाढवण्यासाठी जात पंत भाषा भेद विसरून एकत्र येऊन हिंदू धर्म परंपरा संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण संवर्धन करून देशभक्तीची भावना जागृत करणे हा या विराट हिंदू संमेलनाचा उद्देश असल्याचे सांगितले तर.. पुढे बोलताना माय महाराज म्हणाल्या की, हिंदू समाज हा संस्कृती विसरत चालला असून समाजामध्ये प्रत्येक सण साजरा करताना विकृती निर्माण झाल्या आहेत डीजे वाजवणे, नाचणे,बिभत्स, अश्लील हावभाव करणे, चुकीच्या पद्धतीने गाणे बजावणे सुरू आहे इतर धर्मियांमध्ये धार्मिक प्रथा पाळताना कठोर काळजी घेतली जाते शांतता ठेवली जाते मन लावून प्रार्थना केली जाते हिंदू धर्माच्या उलट झाले आहे त्यामुळे हिंदू धर्मातील लोक कधी सुधारणार आहे ? असा प्रश्न निर्माण झाला असून हिंदू धर्मातील लोक पैशाच्या मागे लागले असून हिंदू समाज एकत्रित करण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही समाजामध्ये दिवसाढवळ्या बलात्कार वाढले असून हिंदू समाजातील मुलींच्या अपुरे कपडे परिधान करण्यामुळे अनेक अपप्रसंग घडले आहेत उपस्थित महिला वर्गांना उद्देशून त्या म्हणाला की, पॅन्ट टी-शर्ट मधील महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पहा आणि नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पहा तुम्हीच तुमचा फरक समजावून घ्या महिलांनी आपल्या मुलींकडे लक्ष द्यावे आपली मुलगी दिवसभर काय करत आहे याकडे लक्ष द्यावे तुमच्या मुलींना फसवण्याचे उद्योग सुरू आहेत याकडे लक्ष द्या हिंदू समाज हा जागरण गोंधळाने अखंड हरिनाम सप्ताह साजरा केल्याने सुधारेलच असे नाही त्यामुळे धर्माविषयी अभिमान निर्माण होईल हिंदू संस्कृतीची ओळख पुन्हा निर्माण करण्याची आवश्यकता आहे युवकांनी प्रचंड मेहनत घेऊन हिंदू धर्मासाठी प्रचंड ताकद उभी करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहनही शेवटी त्यांनी केले अध्यक्षीय समारोप करताना हरिभक्त परायण रामदास डोरले महाराज म्हणाले की आज हिंदू अस्मितेचा जागर झाला असून हिंदू एकतेचा विराट संकल्प आपण सर्वांनी केला आहे या क्षणाला एक दिव्य अधिष्ठान लाभले आहे पवन जयंतीच्या पूर्वसंध्येला आपण हिंदू समाजाच्या एकत्रितरणाविषयी विचार करत आहोत रामाच्या आदर्श यांचे स्मरण करून रामाच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करावा असे आवाहन केले या कार्यक्रमाच्या दरम्यान र आष्टी येथील श्री स्वामी समर्थ महिला मंडळाच्या वतीने राम रक्षा पठण करण्यात आले आणि युनिक योगा अँड मल्लखांब अकॅडमी आष्टी या संस्थेच्या श्रेयस धोंडे, निरंजन लाड, गजानन झाडे, रुद्र भुजबळ, चैतन्य लाड, रणवीर झावरे, अर्णव भुजबळ ,प्रेमराज साबळे, कृष्णा धोंडे, गणेश पाटील, नैतिक धोंडे आणि राष्ट्रीय स्तरावरील मल्लखांब खेळाडू कु.ज्ञानेश्वरी धनवे यांनी मल्लखांब प्रत्यक्ष केले यावेळी मार्गदर्शक संतोष टेकाळे, शत्रुघ्न जरे, आणि रेणुका डोके हे शिक्षक उपस्थित होते

या संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्राध्यापक रवी सातभाई यांनी केले यावेळी आष्टी मंडळातील हिंदू समाजातील सर्व घटकातील बंधू आणि भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते सुरुवातीला प्रभू श्रीराम चंद्राच्या प्रतिमेची आणि विविध वेशभूषा धारण केलेल्या हिंदू समाजातील देवदेवतांच्या भूमिका घेतलेल्या विद्यार्थ्यांची भव्य शोभायात्रा आष्टी शहरातून मुख्य रस्त्यावरून सभास्थळापर्यंत आयोजित करण्यात आली होती

## पान ६ वरुन...

### स्वामी आनंद स्वरूप

विचार मांडणाऱ्यांवर कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी उपस्थित संवेदनशील भीम अनुयायी तथा सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते त्यात महादेव कांबळे, अशोक बावणे, किरण जगताप, अमोल धोत्रे, सागर सावंत, सागर चखाले, अतुल चखाले, किरण साबळे, अप्पा साबळे आदींच्या उपस्थितीत सादर करण्यात आले. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, पोलीस उपाधीक्षक आष्टी आणि पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन आष्टी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

### अंबाजोगाई येथे अंधश्रद्धा

दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि समाजपातळीवर जनजागृती कार्यक्रम राबवावेत, अशीही मागणी करण्यात आली. यावेळी समितीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकृत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

### रोटरी ने लावलेल्या झाडांना आता

तसतसे ती नागरिकांचे लक्ष वेधून घेऊ लागली आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, शहराच्या सौंदर्यात आणि भविष्यातील पर्यावरणीय समतोलात या उपक्रमाचा मोठा वाटा ठरणार आहे. रोटरी क्लबचा हरित माजलगाव हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित न राहता, लावलेले प्रत्येक झाड जगवणे ही खरी पर्यावरणसेवेची जाणीव करून देणारा आदर्श उपक्रम ठरत आहे.

### बीडचे प्रमोद क्षीरसागर

व किचकट गुन्ह्यांतील आरोपीचा शोध लावलेला आहे. पुणे परिसरात दांडगा जनसंपर्क व गरजवंतांना आवश्यक ती मदत करण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत.पुणे जिल्ह्याची गुन्हेगारी रोखण्याची पूर्ण जबाबदारी प्रमोद क्षीरसागर यांच्या खांद्यावर आली आहे, अत्यंत मनमिळाऊ व पोलीस तसेच जनता यांचे संबंध दृढ करण्यासाठी प्रमोद क्षीरसागर नेहमीच प्रयत्नशील असतात, गुन्हेगारावर वचक निर्माण करत अत्यंत किचकट गुन्ह्यांचा तपास त्यांनी पूर्ण केलेला आहे. प्रमोद क्षीरसागर यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली असून त्यांचा प्रदीर्घ अनुभव व गुन्हेगारावर असणारा वाचक पाहता पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या (एलसीबी ) पोलीस निरीक्षक प्रमुख पदाची जबाबदारी ते यशस्वीरित्या पार पाडणार असा ठाम विश्वास पुणे ग्रामीण भागातील नागरिकांच्या वतीने व्यक्त केला जात आहे. बीड शहरातील भूमिपुत्र असलेले प्रमोद क्षीरसागर यांच्या निवडीने बीड जिल्ह्याची मान उंचावली आहे.

### चिंचवण येथे श्रीराम

कीर्तन केले. त्यांच्या कीर्तनाला उपस्थित भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक-भक्तांनी उपस्थित राहून कीर्तनाचा आस्वाद घेतला तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.या संपूर्ण कार्यक्रमामुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. तांबडे कुटुंबीयांच्या या उपक्रमामुळे धार्मिक परंपरा जपली जात असून, ग्रामस्थांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

भाजपाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा केला सत्कार.

चिंचवण येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त तांबडे कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात वडवणी तालुक्यातील नवनिर्वाचित भाजप पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

ना.पंकजाताई व डॉ.प्रितमताईंनी फोनवरून दिल्या शुभेच्छा.

चिंचवण येथे गेल्या ६० वर्षांपासून तांबडे कुटुंबीयांच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. या पारंपरिक सोहळ्याला यावर्षीही भक्तिमय वातावरण लाभले.यावेळी राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी दूरध्वनीवरून तांबडे कुटुंबीयांशी संपर्क साधत श्रीराम जन्मोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या शुभेच्छांमुळे कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

### जिल्हा परिषदेचा

अशा सर्व लोकांनी याकडे काळजीपूर्वक पाहून बिले काढणे गरजेचे असतानाही संबंधित अधिकारी आणि अभियंते कुठलाही विचार न करता आर्थिक लाभासाठी डोळे झाकून एमबीवर सह्या करतात. आणि गुत्तेदार पैसे घेऊन मोकळे होतात. मग अपूर्ण कामे राहिलेली जबाबदारी कोणाची असा प्रश्न या निमीत्ताने उपस्थित होतो. वर्षभरापासून ही कामे पूर्ण करण्यासाठी यंत्रणा राबत असते. मात्र यंत्रणा किती प्रामाणिकपणे राबते हे सर्वांनाच माहित आहे. काही गुत्तेदार तर अकरा महीने शांत राहतात आणि मार्च जवळ आला की कामे सुरू करतात. ही कामे अनेक वेळा अर्धवटच केलेली असतात .तरी यांचे पैसे शासनाकडे पैसे परत जाऊ नये म्हणून जिल्हा परिषद प्रशासन प्रयत्नशील असते. अशा परिस्थितीमध्ये अनेक जण त्याचा फायदा उठवून आपली बिले वसूल करण्याचे काम करतात. सध्या तीन-चार दिवस मार्चला बाकी आहेत. या काळात रात्रंदिवस बसून एमबी तयार करून आपली बिले आपल्या पदरात कशी पडतील यासाठी प्रयत्नशील आहेत.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर

निर्णय घेण्यात आला असून पारंपारिक वाद्याच्या स्वरूपात जयंती उत्सव मिरवणूक काढण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या जयंती उत्सवानिमित्त सम्राट अशोक नगर येथे सामाजिक सांस्कृतिक व प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नूतन कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रेरणादायी संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला. हा जयंती उत्सव शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले. या जयंती उत्सव समितीच्या कार्यकारणी चे उपस्थितांच्या वतीने अभिनंदन करून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीस सचिन जावळे, प्रशिक साळवे, प्रशांत अवचार, पवन राजे शेळके, केतन क्षीरसागर, महेंद्र भाग्यवंत, विशाल पायके, सुरेश नाना क्षिरसागर, करण बापू वावळकर, नितीन गायकवाड, धम्मपाल देशमाने, पियुष निर्मळ, सुरेश बनसोडे, गुड्डू साळवे, विराट चांदमारे, बुद्धीराज सिरसट, मिलिंद शिंदे, रतन राऊत, राजू मोगरेकर, आकाश भद्रे, सौरभ सिरसट, विवेक जाधव, संतोष क्षिरसागर, विजय वैराळे, प्रणव मोरे आदींची उपस्थिती होती.

# शेतरस्त्यावर अतिक्रमण किंवा शेतरस्ता आडवणे पडणार महागात

## नव्या शासन निर्णयात केली शिक्षेची तरतूद

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीमालाची सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. या हेतूने राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये आता नवीन काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामध्ये शेतरस्त्यावर अतिक्रमण किंवा शेतरस्ता आडवणे पडणार महागात पडणार असून, यासाठी शिक्षेचीही तरतूद करण्यात आली



आहे. शेत रस्त्यावर अतिक्रमण केले तर गाव नकाशांवर दर्शविण्यात आलेले व शासकीय जागेत असलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीला तहसीलदार यांनी सदर अतिक्रमण ७ दिवसात काढण्याबाबत नोटीस द्यावी. सदर अतिक्रमण करणाऱ्याने जर अतिक्रमण काढले नाही तर सदर अतिक्रमण शासन स्तरावरून तहसीलदार यांच्यामार्फत काढण्यात येईल. ज्या ठिकाणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ अन्वये किंवा मामलेदार अधिनियम, १९०६ च्या कलम ५ अन्वये इतर शेतकऱ्यांचा ये-जा करण्याचा हक्क मान्य करण्यात आला आहे अशा रस्त्यांवर संबंधित शेतकऱ्यास पीक लागवड करता येणार नाही. तसेच सदर रस्त्यांचे नुकसान करणाऱ्यांचे आधार कार्ड व फार्मर आयडी ५ वर्षांकरीता ब्लॉक करण्यात येईल व शासनाच्या विविध योजनांचे लाभ व कोणतीही शासकीय मदत मिळण्यापासून अपात्र ठरेल.

### शेतरस्त्यास जमीन देण्याबाबत महत्वाच्या बाबी

प्रस्तुत योजना राबविण्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येणार नाही. जे शेतकरी स्वतःहून त्यांची जमीन पाणंद रस्त्याकरीता देतील त्यांनी देण्यात येणाऱ्या जमिनीचे नोंदणीकृत दानपत्र/बक्षीसपत्र/हक्कसोड करणे अनिवार्य राहील. सदर नोंदणीकृत अभिलेखामध्ये लिहुन घेणार म्हणून शासनाच्या वतीने संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच नोंदणीकृत अभिलेखाची नोंद सदर शेतकऱ्याच्या ७/१२ उताऱ्यावर घेण्यात येईल. असे नोंदणीकृत दानपत्र/बक्षीसपत्र/हक्कसोड पत्र हे शासनाच्या लाभात करण्यात येत असल्याने ते नोंदणीकृत करण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३ नुसार मुद्रांक शुल्क व नोंदणी फी माफ आहे. या प्रयोजनार्थ शेतकऱ्याने शासनास दिलेली जमीन परत मागण्याचा/मिळण्याचा सदर शेतकऱ्याला हक्क राहणार नाही.

# पॉलिहाऊसमध्ये केळी लावली तर दुप्पट कमाई



केळी हे महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे आणि मोठ्या प्रमाणावर घेतले जाणारे फळपीक आहे. पारंपरिक पद्धतीने उघड्या शेतात केळीची लागवड अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र सध्याच्या काळात हवामानातील मोठे बदल, अवकाळी पाऊस, वादळी वारे, वाढते तापमान तसेच किडी-रोगांचा प्रादुर्भाव यामुळे केळीच्या उत्पादनावर आणि दर्जावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानही होत आहे. अशा परिस्थितीत पॉलिहाऊस पद्धतीने केळीची लागवड फायदेशीर ठरू शकते का, हा प्रश्न अनेक शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे. पॉलिहाऊसमध्ये तापमान, आर्द्रता, प्रकाश आणि पाण्याचे नियोजन शेतकऱ्याच्या नियंत्रणात असते. केळीच्या पिकासाठी आवश्यक असलेले अनुकूल वातावरण सतत मिळत असल्यामुळे झाडांची वाढ चांगली होते. उघड्या शेतात वादळी वाऱ्यामुळे झाडे मोडणे, पावसामुळे फळगळ होणे किंवा उन्हामुळे झाडांवर ताण येणे अशा समस्या मोठ्या प्रमाणावर दिसतात. मात्र पॉलिहाऊसमध्ये हे धोके कमी होतात. त्यामुळे उत्पादनात स्थिरता येते आणि दर्जेदार केळी मिळते. पॉलिहाऊसमधील केळी आकाराने एकसारखी, आकर्षक दिसणारी आणि चांगल्या प्रतीची मिळते. अशा केळीला बाजारात चांगला दर मिळतो. विशेषतः टिश्यू कल्चर रोपांचा वापर केल्यास झाडांची वाढ एकसमान होते आणि प्रति झाड उत्पादन वाढते. ठिबक सिंचन आणि फर्टिगेशन पद्धतीमुळे खतांचा योग्य वापर होतो आणि खर्चही कमी होतो. तसेच किडी व रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी असल्यामुळे कीटकनाशकांवरील खर्चातही बचत होते.

**लागवड करताना येणाऱ्या अडचणी :**

पॉलिहाऊसमध्ये केळीची लागवड करताना काही अडचणीही आहेत. यामधील सर्वात मोठी अडचण म्हणजे सुरुवातीचा खर्च. पॉलिहाऊस उभारणी, स्ट्रक्चर, शेडनेट, ठिबक सिंचन व्यवस्था यासाठी मोठी गुंतवणूक लागते. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हा खर्च परवडणारा नसू शकतो. याशिवाय या पद्धतीसाठी योग्य तांत्रिक ज्ञान, नियोजन आणि नियमित देखरेख आवश्यक असते. पॉलिहाऊसचे कमी खर्चिक, मध्यम आणि उच्च तंत्रज्ञान असे विविध प्रकार असून त्यानुसार खर्चात फरक पडतो. शासकीय अनुदान योजनांचा लाभ घेतल्यास हा खर्च काही प्रमाणात कमी करता येतो. केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून पॉलिहाऊस उभारणीसाठी ५० टक्क्यांपासून ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. आणि योजनांतर्गत अनुदान मिळते. काही विशेष योजनांमध्ये हे अनुदान ७५ ते ९० टक्क्यांपर्यंत असू शकते. यासाठी शेतकऱ्यांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक असते.

# जमीनीची सुपीकता वाढवण्याचे सोपे उपाय

**शेतातील पिकांना पाण्याचा, रासायनिक खतांचा अतिवापर होत असल्याने महाराष्ट्रातील जमिनी क्षारपट होत चालल्या आहेत. जमिनीचा सामू वाढत आहे, त्यामुळे जमिनी नापिकीच्या उंबरठ्यावर आलेल्या असुन कोणत्याही पिकांपासून अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याने शेती तोट्यात जात आहे. जमिनी नापिक होण्यापासून वाचवण्यासाठी प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे. जल, जमीन आणि हवामान हे घटक जोपर्यंत पिकांना पोषक होणार नाही, तोपर्यंत बळीराजा खऱ्या अर्थाने राजा होऊ शकत नाही. शेतीचे नुस्ते उत्पादन वाढल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत नाही तर त्याच्या उत्पादनाला बाजारात उत्पादन खर्चावर आधारित चांगला भाव मिळत नाही. तोपर्यंत या देशांची अर्थव्यवस्थाच मोठी होऊच शकणार नाही. शेती या व्यवसायाला प्रतिष्ठा देऊन, सद्यस्थितीत चालना देणे अत्यंत गरजेचे आहे.**


**जमिनीची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाय :**

शेतकरी बांधवांनी तीन वर्षात एकदातरी रब्बी हंगामात कोरडवाहू करडई पीक त्यानंतर उन्हाळी हंगामात मूग कडधान्य पीक घेणे गरजेचे आहे. दोन्हीं पीक जमिनीच्या सुपीकतेसाठी आणि सुधारणेसाठी अत्यंत उपयुक्त मानले जातात. करडई पिकाची मुळे जमिनीत खोलवर जात असल्याने ते जमिनीच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. तसेच मूग पिकाच्या मुळावर रिझोबियम जिवाणूंच्या गाठी असतात. त्यामुळे हवेतून नत्राचे स्थिरीकरण होण्यास मदत होते. विशेषतः जमिनीची धूप थांबवण्यासाठी आणि जमिनीचा कस वाढवण्यासाठी दोघेही उत्तम पीक आहेत.

खोल नांगरट : जमीन ३ वर्षांतून एकदा खोल नांगरट करावी, जेणेकरून मुळे खोलवर जाऊन जमीन सुधारण्यास मदत होईल.

सेंद्रिय खत : जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी शेणखत, कंपोस्ट खत किंवा हिरवळीची खते (उदा. ताग, धैंचा) वापरावीत. हेक्टरी ५ टन कुजलेले शेणखत वापरल्यास जमिनीचा पोत सुधारतो.

जमिनीची भुसभुशीतपणा : जमिनीत खोलवर सोट मुळ जाणाऱ्या पिकांची लागवड करणे, मुळे जमिनीत खूप खोल (२ ते ३ मीटरपर्यंत) गेल्यामुळे जमिनीच्या खालील थरातील कडकपणा कमी होतो आणि जमीन



भुसभुशीत होण्यास मदत होते. तसेच जमिनीचे पोत सुधारण्यास मदत होते.

पोषक तत्वांचे पुनर्चक्रण : मुळे जमिनीच्या खोल थरातून पोषक तत्वे वर आणतात, ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. पिकाची कापणी केल्यानंतर उरलेला पाचोळा किंवा अवशेष जमिनीत मिसळल्यास ते जमिनीसाठी उत्तम सेंद्रिय खत ठरतात.

हवेची हालचाल : मुळे खोल गेल्यामुळे जमिनीच्या आत हवेची हालचाल सुधारते, ज्यामुळे मातीची रचना सुधारते.

सेंद्रिय कर्ब : पाने गळणाऱ्या आणि मूळ कुजणाऱ्या पिकांची लागवड करावी जेणे करून पाने, मूळ कुजल्यानंतर जमिनीत सेंद्रिय पदार्थ वाढेल.


पिकांची फेरपालट : म्हणजे एकाच जमिनीत दरवर्षी तेच पीक न घेता पिके बदलून घेणे. यामुळे जमिनीचा कस टिकून राहतो. वेगवेगळ्या गटातील पिके आलटून पालटून घेतल्याने जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

क्षारयुक्त पाणी टाळणे : क्षारयुक्त पाणी पिकांसाठी अत्यंत घातक मानले जाते. योग्य व्यवस्थापन न केल्यास ते जमिनीची आणि पिकांची कायमस्वरूपी हानी करू शकते. ठिबक सिंचन : जमिनीतील पिकांना मोकाट पद्धतीने पाणी देण्याचे टाळून पाण्याचा वापर ठिबक सिंचनाद्वारे करणे अधिक फायदेशीर ठरते, पिकांना गरजे पुरता मोजके पाणी दिल्याने जमिनीची सुपीकता टिकुन राहण्यास मदत होते. जमिनीत पाणी साचून राहू देऊ नये, यासाठी योग्य निचरा व्यवस्था करावी. जमिनीत पाण्याचा निचरा योग्य राहील याची काळजी घ्यावी, जेणेकरून क्षार जमिनीच्या खाली जाण्यास मदत होईल.

# गव्हावरचा 'कर्नाल बंट' रोग आहे सर्वात खतरनाक

**गव्हाच्या पिकामध्ये ओंब्या काळ्या पडताना दिसत असतील, तर शेतकऱ्यांनी याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. ही समस्या केवळ दिसण्यापुरती मर्यादित नसून थेट उत्पादनावर आणि उत्पन्नावर मोठा परिणाम करणारी ठरू शकते. गव्हाच्या ओंब्या काळ्या पडण्यामागे कर्नाल बंट नावाचा एक धोकादायक बुरशीजन्य रोग कारणीभूत असतो. वेळेवर लक्ष न दिल्यास हा रोग संपूर्ण पीक खराब करू शकतो.**

कर्नाल बंट रोगाची लक्षणे सुरुवातीला फारशी स्पष्ट दिसून येत नाहीत. बहुतांश वेळा हा रोग कापणीनंतर किंवा मळणीच्या वेळी लक्षात येतो. या रोगामुळे गव्हाच्या दाण्यांचा काही भाग किंवा संपूर्ण दाणा काळा पडतो आणि आतून पावडरसारखा होतो. अशा दाण्यांना कुजलेल्या माशासारखा वास येतो, जो या रोगाची प्रमुख ओळख मानली जाते. प्रभावित ओंब्या पूर्णपणे भरलेल्या नसतात आणि त्यांची गुणवत्ता पूर्णपणे घसरते.हा रोग पसरण्यासाठी हवामान मोठी भूमिका बजावते. गव्हाच्या फुलोऱ्याच्या काळात जर तापमान ८ ते २३ अंश सेल्सिअस दरम्यान असेल आणि वातावरणात जास्त आर्द्रता, ढगाळ हवामान किंवा हलका पाऊस असेल, तर कर्नाल बंट रोगाचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे बारकाईने निरीक्षण करणे अत्यंत गरजेचे असते.



**हा रोग येण्यामागील कारणे :**

बियाणे आणि माती हेही या रोगाच्या प्रसारामागील महत्त्वाचे घटक आहेत. जर पेरणीसाठी वापरलेले बियाणे आधीच संक्रमित असेल, तर रोग झपाट्याने पसरतो. तसेच जमिनीत असलेले बुरशीचे बीजाणू (टेलिओस्पोर्स) अनेक वर्षे सक्रिय राहू शकतात. त्यामुळे पेरणीपूर्वी बियाण्यांची योग्य तपासणी आणि प्रक्रिया करणे अत्यावश्यक ठरते.

**या रोगावर नियंत्रण :**

या रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन पद्धती अवलंबणे गरजेचे आहे. सर्वप्रथम प्रमाणित व रोगप्रतिकारक बियाण्यांचाच वापर करावा. बियाणे खरेदी करताना केवळ विश्वासार्ह विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी आणि निकृष्ट किंवा बनावट बियाणे टाळावीत. पेरणीपूर्वी योग्य बुरशीनाशकाने बीजप्रक्रिया केल्यास रोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.पीक फेरपालट म्हणजेच पीक रोटेशन हाही एक महत्त्वाचा उपाय आहे. सलग अनेक वर्षे गहूच लागवड केल्यास या रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे किमान पाच वर्षे गहू व्यतिरिक्त इतर पिकांची लागवड करावी. यामुळे जमिनीत असलेले रोगकारक घटक कमी होण्यास मदत होते.सिंचन व्यवस्थापनाकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. गहू फुलोऱ्याच्या अवस्थेत असताना शेतात जास्त ओलावा राहणार नाही याची काळजी घ्यावी. पाणी साचणार नाही यासाठी योग्य निचऱ्याची व्यवस्था करावी.कर्नाल बंट रोगामुळे गव्हाच्या उत्पादनात थेट ४० ते ५० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. यामुळे बाजारात दर कमी मिळतात आणि निर्यातीसाठी पीक अयोग्य ठरते. त्यामुळे वेळेवर योग्य उपाययोजना करून या रोगापासून गव्हाचे पीक वाचवणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

# मासेपालन, बदकपालन व्यवसाय करेल लखपती; असे करा एकत्रित नियोजन !

**महाराष्ट्रात शेतकरी शेतीसोबतच अनेक जोडधंदे करत मोठी आर्थिक कमाई करत असतात. यात प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय दुसऱ्या स्थानी असून, अनेक भागांमध्ये मोठ्या शेततळ्यांमध्ये शेतकऱ्यांकडून मासेपालन केले जाते. विशेष म्हणजे राज्य सरकारकडून देखील शेतकऱ्यांना वेळोवेळी मासेपालनासाठी अनुदान उपलब्ध करून दिले जाते. ज्यामुळे सध्या अनेक शेतकरी मासेपालन व्यवसायाकडे वळत आहे. याच पार्श्वभूमीवर मासेपालन आणि बदकपालन एकत्रिपणे कसे करायचे? याबाबतचे तंत्र जाणून घेणार घेतल्यास मासेपालन व्यवसायातील कष्ट कमी होण्यास मदत होणार आहे.**

**दोन्ही व्यवसाय एकत्रित का?**

मासेपालन आणि बदकपालन एकत्रिपणे का करायचे? तर मासे ज्याप्रमाणे पाण्यात राहतात. अगदी त्याच पद्धतीने बदकाला देखील पाण्यास राहण्यास आवडते. ज्यामुळे एकाच तळ्याच्या



माध्यमातून शेतकऱ्यांना मासेपालन आणि बदकपालन करणे शक्य होणार आहे. ज्यामुळे दोन्ही व्यवसाय करताना उत्पादन खर्च कमी राहून त्यातून दुप्पट नफा मिळण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे बदकपालन केल्याने शेततळ्याची शेवाळ किंवा अन्य बाबतीत देखील साफसफाई होते. ज्यामुळे माशांना देखील स्वच्छ ऑक्सिजन मिळण्यास मदत होते. त्यातून त्यांची पटकन वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे शेतकरी मासेपालन आणि बदकपालन एकत्रितपणे करून मोठी कमाई करू शकतात.

**उत्पादन खर्चात होईल बचत :**

कृषी व्यवसाय क्षेत्रातील जाणकारांच्या मते, मासेपालन आणि बदकपालन एकत्रितपणे केल्यास, माशांच्या खाद्यासाठी ७५ टक्के खर्च कमी होतो. याशिवाय बदक पालनादरम्यान बदकांच्या आहारावर होणारा खर्च देखील जवळपास ३० ते ३५ टक्के इतका कमी होतो. याशिवाय शेततळे एकच असल्याने तो खर्च देखील कमी होतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना या दोन्ही व्यवसायांची सांगड घालून दुप्पट नफा कमावता येऊ शकतो.

**असे करा बदकपालन :**

साधारणपणे एक बदक जन्मल्यानंतर २४ आठवड्यानंतर अंडी देण्यास सुरुवात करते. त्यानंतर जवळपास २ वर्ष ही प्रक्रिया सुरु राहते. त्यामुळे तुम्ही एका तळ्यात जवळपास २५० ते ३०० बदक सहजपणे पाळू शकतात. तळ्यामध्ये मासेपालन करताना शेतकऱ्यांनी माशांचे छोटे बीज न टाकता, त्याऐवजी आकाराने मोठे असलेले ४ ते ५ हजार फिंगरलिंग टाकले पाहिजे. त्यानंतर माशांना पाण्यामध्ये खाण्यासाठी धानाचे भूस, ढेप, मिनरल मिक्चर टाकले पाहिजे. ज्यामुळे ६ ते ९ महिन्याच्या कालावधीमध्ये एक मासा एक किलोपर्यंत वाढण्यास मदत होते.

**किती मिळते उत्पन्न?**

जर तुम्ही एक एकराच्या तळ्यात मासेपालन आणि बदकपालन एकत्रिपणे करत असाल तर तुम्हाला त्यातून १८ ते २० क्विंटलहुन अधिक माशांचे उत्पादन मिळू शकते. तर बदक पालन करताना तुम्ही बदकांना खाद्य म्हणून बरसीमचे गवत, ओट्स, पालेभाज्या, भाताचे भुस, खनिज मिश्रण आणि बाजारात तयार खाद्य देऊ शकता. साधारणपणे चार ते साडेचार महिन्यात बदक अंडी देण्यास सुरुवात करते. ज्यामुळे तुम्ही एकत्रिपणे मासेपालन आणि बदकपालन करून ५ ते ६ लाखांची कमाई सहज करू शकतात.




### जागतिक दिवस
### राष्ट्रीय नौका दिवस

### महत्वाच्या घटना

१५६१ : मुघल बादशाहा अकबर यांनी मालवा प्रांताची राजधानी 'सारंगपूर' येथे हल्ला करून तेथील सुलतान बाजबहादूर यांचा पराभव केला.
१८४९ : ब्रिटीश ईस्ट ईंडिया कंपनीने पंजाब खालसा केले.
१८४९ : ब्रिटिश साम्राज्याने पंजाब ताब्यात घेतले.
१८५७ : क्रांतिकारक मंगल पांडे यांनी बराकपूरच्या छावणीमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या व इथूनच १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाला खरी सुरुवात झाली.
१८५७ : बेंगाल नेटिव्ह इन्फंट्रीच्या ३४ व्या तुकडीतील शिपाई मंगल पांडे याने इस्ट इंडिया कंपनीतील ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या. या घटनेतुनच १८५७ च्या राष्ट्रीय उठावाची सुरूवात झाली.
१९३० : 'प्रभात'चा 'खूनी खंजिर' हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला.
१९४२ : क्रिप्स योजना जाहीर
१९५४ : भारत सरकारच्या कार्मिक मंत्रालया अंतर्गत कार्यरत असलेली संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच 'भारतीय लोक प्रशासन संस्था' ची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे प्रथम अध्यक्ष टी. एन. चतुर्वेदी होते. तसचं, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू हे या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहे.
१९६२ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या पेनिसिलिन कारखान्यातील स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादन प्रकल्पाचे अनावरण झाले.
१९६८ : महात्मा फुले कृषी विद्यापीठाची राहुरी येथे स्थापना
१९६९ : भा. द. खरे यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर 'अमृतपुत्र' ही कादंबरी लिहिण्यास प्रारंभ केला.
१९७० : दत्तो वामन पोतदारांने 'शिवचरीत्र' ह्या ग्रंथाच्या लेखनास प्रारंभ केला.
१९७३ : व्हिएतनाम युद्ध व्हिएतनाममधुन शेवटचा अमेरिकन सैनिक बाहेर पडला.
१९८२ : एन. टी. रामाराव यांनी तेलगू देसम पक्षाची स्थापना केली.
२००४ : भारतीय फलंदाज वीरेंद्र सेहवाग याने पाकिस्तान विरुद्ध कसोटी क्रिकेट सामन्यात ३०९ धावांची खेळी केली व त्रिशतक झळकवणारा पहिला भारतीय फलंदाज झाला.
२००४ : आयर्लंड देशाने कामाच्या ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी घातली. अश्या प्रकारची बंदी लागू करणारे ते जगातील पहिले राष्ट्र ठरले. २९ मार्च या तारखेपासून सार्वजनिक आरोग्य (तंबाखू) अधिनियमांतर्गत बंद असलेल्या कार्यलयाच्या परिसरात धूम्रपान करणे बेकायदेशीर ठरले आहे.
२०१४ : इंग्लंड आणि वेल्स मध्ये प्रथम समलिंगी विवाह झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६९ : सर एडविन लुटेन्स दिल्लीचे नगररचनाकार (मृत्यू: १ जानेवारी १९४४)
१९१३ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेता हिंदी भाषिक कवी व लेखक भवानी प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१८ : वॉलमार्ट चे निर्माते सॅम वॉल्टन यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल १९९२)
१९२६ : पांडुरंग लक्ष्मण तथा 'बाळ' गाडगीळ अर्थशास्त्रज्ञ व विनोदी लेखक (मृत्यू: २१ मार्च २०१०)
१९२८ : भारताचे परराष्ट्र सचिव तसेच, दिल्ली, अंदमान आणि निकोबार या केंद्रशाशित प्रदेशाचे माजी उपराज्यपाल. याचप्रमाणे त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश या राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचा जन्मदिन.
१९२९ : उत्पल दत्त रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात आपला ठसा उमटवणारे कलाकार (मृत्यू:१९ ऑगस्ट १९९३)
१९३० : अनिरुद्ध जगन्नाथ मॉरिशसचे पंतप्रधान
१९३९ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेता व हास्यकलाकार सय्यद इश्तियाक अहमद जाफरी उर्फ जगदीप यांचा जन्मदिन.
१९४३ : जॉन मेजर इंग्लंडचे पंतप्रधान
१९४८ : नागनाथ कोतापल्ले साहित्यिक, शिक्षणतज्ञ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू
१९९८ : भारतीय व्यावसायीक गोल्फ खेळाडू अदिती अशोक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५२ : शिखांचे दुसरे गुरू गुरू अंगद देव यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १५०४)
१९६२ : करमचंद थापर, भारतीय उद्योगपती.
१९६३ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार व राष्ट्रकवी सियारामशरण गुप्त यांचे निधन.
१९६४ : शंकर नारायण जोशी, भारतीय इतिहाससंशोधक
१९७१ : धीरेंद्रनाथ दत्ता बांगलादेशी राजकारणी (जन्म: २ नोव्हेंबर १८८६)
१९९७ : पुपुल जयकर सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (जन्म: ११ सप्टेंबर १९१५)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# ३० उद्योजक महिलांना पुरस्कार प्रदान

## शासनाकडून हस्तीमल बंब यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार



जालना प्रतिनिधी

व्यापारी महासंघ जिल्हा जालनाच्या वतीने महिला दिना निमित्त जिल्ह्यातील लहान-सहान उद्योजक महिलांना व्यापारी संघटना कॅटची राष्ट्रीय प्रमुख व महिला गृह उद्योग महाराष्ट्र शासनाची राज्य संयोजिका सौ. पौर्णिमा शिरीषकर (मुंबई) यांच्या शुभ हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले, अशी माहिती जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी दिली.

यात उज्वला सोमाणी (टेंभुर्णी), जयश्री आकात (सातोना), सविता घाटगे (जळगांव सपकाळ), सौ. जयश्री खरात (हसनाबाद), सौ. नंदा गाडे (दाभाडी), श्रीमती कमल वायकर (म. चिंचोळी), सौ. स्वाती तौर (आष्टी), सौ. रेवती शेळके (जाफ्राबाद), सौ. सिमला गवळी (माहोरा), सौ. उमा संभेराव (अण्वापाडा), सौ. संगिता थोटे (राजुर ग.), सोनाली सांवत (बदनापुर), सौ. वंदना देशमुख (तळणी), श्रीमती अर्चना बोकण (कुं. पिंपळगांव), उर्मिला अंबेकर (वडोद तांगडा), श्रीमती ज्योती बोर्डे (पिंपळगांव रे), श्रीमती स्वाती गिराम (सिंधी काळेगांव), सौ. राधा पोपळघट (हिसोडा), उषा चव्हाण (रामनगर सा.का.), सौ. वैशाली जाधव (भोकरदन), सौ. सारिका शेजुळ (जामखेड), श्रीमती रमा भुसारे (शहागड), सौ. शकुंतला लोहिया (अंबड), सौ. रेणुका पल्लोड (रोहिलागड), शेख आसमा मुजीब (घनसावंगी), श्रीमती कालिंदा अवघड (तीर्थपुरी), सौ. स्वाती लव्हाळे (धावडा), सौ. दुर्गा काबरा (परतुर) यांना अभिनंदन पत्र, शाळ, पुष्पगुच्छ प्रदान करुन पुरस्कार देण्यात आले. त्यावेळी सौ. शिरीषकर म्हणाल्या व्यापारी संघटनेत महिलांना समान आरक्षण देणारा होतकरु, कष्टकरी, गोर-गरीब, लहान-सहान विशेष करुन ग्रामीण भागातील महिलांना शासकीय योजना, अनुदान, कर्ज मिळावे व प्रत्येक गावात महिला आघाडी उभारणारा राज्यात एकमेव जालना जिल्हा आहे, याचा सर्व श्रेय श्री बंब यांनाच आहे. नुकतेच जालना जिल्ह्याला राज्यस्तरीय पुरस्कार सुध्दा देण्यात आले होते. मी शासकीय प्रतिनिधीच्या नात्याने उद्योग मंत्रालयातुन श्री हस्तीमल बंब यांना लवकरच मुंबई येथे भव्य समारोहात महाराष्ट्र भुषण पुरस्काराने गौरविण्यात येईल, असे सौ. शिरीषकर म्हणाल्या. जिल्हा महिला अध्यक्षा सौ. प्रिया जोशी यांनी प्रास्ताविक केले. मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील, सचिवा सौ. आनंदी अय्यर यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष भाषण करतांना बंब म्हणाले, या वर्ष भरात गरजु एक हजार महिलांना शासकीय योजना, अनुदान, कर्ज मिळवून देण्याचे आमचे प्रयत्न आहे. जालना जिल्हा महिला आघाडीच्या कार्यात राज्यात अव्वल आहे, असे बंब म्हणाले. कार्यक्रमाचे आभार सचिवा सौ. संगिता पांगारकर यांनी मांडले तर सुत्र संचालन सौ. प्रतिभा खाडे यांनी केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला-पुरुष व्यापारी उपस्थित होते.

# अतिक्रमणवरील घरे नियमित करून, रहिवासी होणार मालक-आ. लोणीकर

शिवाजी मस्के । जालना

विकसित महाराष्ट्रातील प्रत्येकाला राहण्यासाठी घर मिळाले पाहिजे या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने क्रांतिकारी निर्णय घेतलेला असून २० मार्च २०२६ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार शासनाच्या मालकीच्या अतिक्रमण झालेल्या जागेवर या नागरिकांनी घरे बांधले आहेत ती नियमित करून त्या घरांची मालकी नागरिकांना मिळणार असल्या ची माहिती माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी दिली आहे

आमदार लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, यासाठी नागरिकांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या पुराव्यासह सादर करून त्यासोबत ज्या शासनाच्या अतिक्रमण केलेल्या जागेवर घर आहे तेथील मतदार यादीतील नाव, विज बिल ग्रामपंचायतचे रेकॉर्ड आदी पुरावे जोडणे आवश्यक असून ,



**मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांचे लोणीकरांनी मानले आभार**

व्यावसायिक वापरासाठी असलेल्या घरांना नियमित करता येणार नसून फक्त निवासी वापरासाठी असलेल्या घरांना नियमित करण्यात येणार आहे असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे

पुढे या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की शासनाच्या ज्या जागेवर नागरिकाचे घर आहे ते ५०० चौरस फुटापर्यंत असेल तर अगदी मोफत भोगवटादार म्हणून त्या घराची मालकी त्यांना मिळणार आहे १५०० चौरस फुटांच्या घरासाठी त्या भागातील बाजारभावाच्या १० टक्के रक्कम भरून घराची मालकी मिळवता येणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले असून

दरम्यान महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या या क्रांतिकारी निर्णयाची आमदार बबनराव लोणीकर यांनी स्वागत केले असून, २०४७ पर्यंत च्या विकसित महाराष्ट्र टप्प्यातला प्रत्येक नागरिकाला घर हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा असून याबद्दल माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले असून परतूर विधानसभा मतदारसंघातील शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या घरांना नियमित करून घेण्यासाठी आपले अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे

# रोजगार मेळाव्यात ११० तरुणांना मिळाली नोकरी

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देत, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी ११० उमेदवारांची निवड केली असून, त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळाली आहे.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण ठरले ते छत्रपती संभाजीनगर येथील धूत ट्रान्समिशन प्रा. लि. हे औद्योगिक गृह. या कंपनीने २७ पात्र उमेदवारांना निवडीनंतर तात्काळ नियुक्तीपत्रे देऊन त्यांच्या उत्साहात भर घातली. शुक्रवार दि.२७ मार्च रोजी शासकीय आयटीआय जालना येथे हा मेळावा पार पडला. सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी शासकीय आयटीआयच्या प्राचार्या श्रीमती तृप्ती भोपे आणि उपप्राचार्या श्रीमती रजनी शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात इयत्ता पाचवी ते दहावी, बारावी आणि आयटीआय (सर्व ट्रेड्स) उत्तीर्ण असलेल्या शेकडो उमेदवारांनी हजेरी लावली होती. मेळाव्यात एकूण ९ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये असिस्टंट मॅनेजर, ब्रांच मॅनेजर, कॅशियर, टेक्निशियन, ऑपरेटर, फील्ड एक्झिक्युटिव्ह, हेल्पर आणि ए.सी.सी. मशीन ऑपरेटर अशा विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. एकूण ११० उमेदवारांना या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल परिहार यांनी केले, तर आभार प्रदर्शन एस. जी. चव्हाण यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी आयटीआयचे गटनिदेशक एस. एस. कापसे, ए. एस. धाबे, बी. डी. वाणी यांच्यासह कौशल्य विकास विभागातील भुजंग रिठे, अमोल बोरकर, आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, योगेश बहुरे, नितीन लोकडे, कैलास काळे, रवींद्र पाड्मुख, विशाल जगरवाल, दीपक पालवे आणि गणेश सुपारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

# भोंदूगिरी जादूटोणा विरोधी कायद्यान्वये कारवाईसाठी तहसीलदारांना निवेदन

पाथर्डी प्रतिनिधी

राज्यात उघडकीस आलेल्या भोंदूगिरी आणि बुवाबाजीच्या घटनांमुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यात चालणाऱ्या अनिष्ट प्रथा,, जादूटोणा आणि लोकांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांवर कडक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आता आक्रमक पाऊल उचलले आहे. प्रशासनाने या गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण करावा या मागणीसाठी पाथर्डी पोलीस उपविभागीय अधिकारी नीरज राजगुरू यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले आहे.

दैवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष किंवा अध्यात्माच्या नावाखाली भोळ्या लोकांची आर्थिक फसवणूक करणे, त्यांचा मानसिक छळ करणे



आणि महिलांचे शोषण करणे हे गंभीर गुन्हे आहेत. अशोक खरात सारखी भयंकर प्रकरणे पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. फलज्योतिष किंवा चमत्काराचा दावा करून जे लोक फसवणूक करत आहेत त्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर जादूटोणा विरोधी कायद्यानुसार तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे निवेदनात स्पष्टपणे म्हटले आहे. निवेदन देताना समितीचे अहिल्यानगर जिल्हा बुवाबाजी संघर्ष कार्यवाह शशिकांत गायकवाड, पाथर्डी तालुका अध्यक्ष वसंतराव बोर्डे, उपाध्यक्ष राजेंद्र सातपुते यांच्यासह साईनाथ जगन्नाथ, बोर्डे सुभाष, बन्सी गायक्वाड, श्रीधर दौंड, सिद्धार्थ वसंत बोर्डे, पंढरीनाथ कांजवणे, भीमा लक्ष्मण थोरात आणि एम.डी.ढाळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरत खेडकर वर्दीतला साहेब झाला !

**ऊसतोड मजूर शेतकऱ्याच्या पोराचे पोलीस भरतीत यश**

पाथर्डी । प्रतिनिधी

भगवानगड परिसरातील मालेवाडी गावचा सुपुत्र भरत अण्णासाहेब खेडकर याने नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत नेत्रदीपक यश संपादन करत यशाला गवसणी घातली आहे. यामुळे ऊसतोड मजूर शेतकऱ्याचा पोरगा वर्दीतला साहेब झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

भरत अण्णासाहेब खेडकर या २६ वर्षे युवकाने पुणे शहर पोलीस भरतीत यश संपादन करून शासकीय नोकरीस पात्र ठरला आहे. त्याच्या यशाकडे पाहून गुरे ओळणारे पोरगं साहेब झाला, वर्दीतला मोठा नायब झाला आहे. त्याचा दरारा असे सरकारी दप्तरात तुझ्या न माझ्या घरात बाबासाहेबामुळे. या पंक्ती त्याच्या या अथक कष्ट, जिद्द आणि



परिश्रमाला लागू होत आहेत. मालेवाडी येथील अण्णासाहेब खेडकर या ऊसतोडमजूर गरीब शेतकरी कुटुंबातील भरत खेडकर यांनी पोलीस भरतीत खाकी वर्दीत शासकीय नोकरी प्राप्त केल्याने, भगवानगड परिसरातील अनेक युवकांना त्याच्याकडून प्रेरणा मिळाली आहे. भरत अण्णासाहेब खेडकर त्याच्या यशाबद्दल कौतुक केले जात आहे.

# वाळूमाफिया व मंडळ अधिकारी दलाल संजय उफाड यांच्यामुळे महसूल वसुलीवर परिणाम ; उफाडवर कारवाईची मागणी

मंठा प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी मंडळाचे मंडळ अधिकारी संजय उफाड यांचे वाळूमाफियांसोबत अर्थपूर्ण हितसंबंध असून, ते वाळूमाफीया आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यातील आर्थिक दलाल असल्याचे बोलले जाते. मंडळ अधिकारी उफाड यांच्यामुळे महसूल वसुली टक्केवारी ढासळली.

तळणी येथील मंडळ अधिकारी संजय उफाड यांच्या कार्यक्षेत्र अवैधरित्या नियमापेक्षा जास्त वाळू उत्खनन व वाहतूक होत असून कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी श्रीमती आशीमा मित्तल यांनी मंडळ अधिकारी उफाड यांच्यावर बडतर्फीची कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे. मंडळ अधिकारी श्री उफाड यांच्यामार्फत प्रशासनाला अवैध वाळू वाहतुकीच्या वाहनांचे हप्ते पोहोचविले जात असून त्यांच्या कार्यक्षेत्रात अद्याप ठोस अशी मोठी कारवाई झालेली नाही. संजय उफाड यांच्या कार्यक्षेत्रातील पूर्णा नदी काठावरील किर्ला, वाघाळा, दुधा, टाकळखोपा, इंचा, सासखेडा, कानडी, लिंबखेडा हनवतखेडा, उस्वद - देवठाणा, देवठाणा - उस्वद या गावाच्या हद्दीतून अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीच्या माध्यमातून मंडळ अधिकारी संजय उफाड यांनी मोठी उलाढाल केल्याचे बोलले जाते. प्रशासनातील अधिकारी आर्थिक मॅनेज करून वाळू माफियांना अभय देण्याचे काम मंडळ अधिकारी संजय उफाड हे करीत असून मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करावी व त्यांना सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी जोर धरत आहे.

# खरवंडी कासार ग्रामपंचायत भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याचे नाशिक विभागीय आयुक्तांचे लेखी आदेश !

## इनामी देवस्थान १६० एकर जमिन शासनवर्ग करण्याची मागणी

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार ग्रामपंचायतने केलेल्या भ्रष्ट कारभाराचे तक्रार माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र जायभये यांनी मुख्यमंत्री सचिवालय आणि नाशिक विभागीय आयुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. याची गंभीर दखल घेत नाशिक विभागीय आयुक्तांनी खरवंडी कासार ग्रामपंचायतच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याचे लेखी आदेश दिले आहेत.

या निवेदनात खरवंडी कासार ग्रामपंचायतमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनेचा भ्रष्ट कारभार उघड केला आहे. यामध्ये खरवंडी कासार ग्रामपंचायतमध्ये पात्र नसणाऱ्या लाभार्थ्यांना पात्र करून घरकुलाचे बांधकाम न करता हप्ते वितरित केल्याचा आरोप केला आहे. यामध्ये ग्रामपंचायतच्या सरपंचाच्या आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संगणमताने आर्थिक तडजोड करून घरकुल योजनेत मोठा घोटाळा केलाचा आरोप केला आहे. तसेच २०२१ ते २०२५ यादरम्यान शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या पंधराव्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीतून करोडो रुपयांच्या निधीतून ग्रामपंचायत अंतर्गत सिमेंट काँक्रिटीकरण रस्ते पेविंग ब्लॉक बसवणे साईड गटार चेंबर इत्यादी कामात निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाचा वित्त आयोगाचा लाखो रुपयांचा निधी हडप केला आहे. ग्रामपंचायत पंधरावा वित्त आयोग निधीचा गैरवापर केल्यामुळे ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ३ प्रमाणे ग्रामपंचायतच्या दप्तर चौकशीची मागणीही करण्यात आली आहे. खरवंडी कासार हे मोठ्या महसुलीचे ग्रामपंचायत असल्याने, येथे जमा होणाऱ्या ग्रामनिधीचा वापर गावातील स्वच्छता पाणी घनकचरा आणि कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर न करता ग्रामनिधी सुद्धा हडप करण्यात आला आहे. ग्रामपंचायत विविध शासनाच्या निधी व गावांतर्गत केलेल्या विकास कामात बेकायदेशीर घेतलेले ग्रामपंचायतचे ठराव कामाच्या मोजपट्ट्या बनावट बिले याची माहिती अधिकार कायदा अधिनियम २००५ अनुसार माहिती मागवली असून, खरवंडी कासार ग्रामपंचायतची भ्रष्ट कारभाराच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री सचिवालय आणि नाशिकचे विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.

### देवस्थानच्या जमिनीचा व्यावसायीक वापर

खरवंडी कासार ग्रामपंचायत अंतर्गत राम मंदिर देवस्थान ट्रस्ट २५ एकर जमीन जनार्दन स्वामी देवस्थान ट्रस्ट ६५ व एकनाथ महाराज पैठण ट्रस्ट ७० एकर जमीन असल्याने, या जमिनी शासनाने इनामी किंबहुना देवस्थान जमिनीचा त्यांना दर्जा दिला असल्याने या जमिनी कमर्शियल उपयोगासाठी वापर करत असल्याचा संशय आहे. सूत्रांच्या माहितीनुसार या जमिनी वहिवाटदारांनी आपसात आर्थिक तोडजोड करून ९९ वर्षाच्या करारबद्ध करून शासनाच्या देवस्थानच्या जमिनीवर बेकायदेशीरत्या अतिक्रमण केल्याची माहिती आहे, यामुळे खरवंडी कासार ग्रामपंचायत इनामी देवस्थानच्या जमिनी महाराष्ट्र जमीन महसूल शासन अधिनियम १९६६ कलम ७५ अनुसार शासनवर्ग करून खरवंडी कासार अंतर्गत इनामी देवस्थानच्या जमिनीची शासनाच्या धर्मादाय आयुक्त समितीमार्फत चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करावी. -(प्रा.शैलेंद्र जयाभाये, जिल्हाध्यक्ष माहिती अधिकार महासंघ अहिल्यानगर).

## जाहिर प्रगटन

मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क. २९७/२०२६

**ॲड. व्ही.एस फाटक**

महादेव पि.श्रीरंग बहिरवाळ व इतर वि. निरंक

अर्जदार : १. महादेव पि. श्रीरंग बहिरवाळ, तय ४७ वर्षे, धंदा-शेती, रा.मंझरी हवेली ता.जि.बीड २. गणेश पि. श्रीरंग बहिरवाळ, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरणः- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत श्रीरंग पि. विठ्ठल बहिरवाळ यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत श्रीरंग पि.विठ्ठल बहिरवाळ हे दिनांक ०१/१२/२०२५ रोजी राहते घरी मौजे मंझरी हवेली ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयताची पत्नी तसेच मयत्ताचे आई, वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत मयतास मुलगी नाही. अर्जदाराशिवाय मकवाने ईरार कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे श्रीरंग पि. विठ्ठल बहिरवाळ रा. मंझरी हवेली ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी पुढील तारीख ०४/०४/२०२६.

आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी व्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

| आदेशावरुन, स्वाक्षरित / - कनिष्ठ लिपीक | स्वाक्षरित / - अधिक्षक दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड |
|---|---|

## जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच बीड जिल्हा कार्यालय

**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक ०६ मार्च २०२६**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / ४३७**

## जाहिर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**

Under the Consumer Protection Act, 2019
Telephone No.: 02442-230501
Email: confo-bi-mh@nic.in Website:

**HOUSE NO.1-4-1600, UTTAMNANDA BUILDING, IST FLOOR AMBIKA CHOWK, PANGRI ROAD, SHAHU NAGAR DISTRICT BEED MAHARASHTRA**
**CONSUMER CASE NO. DC/470/CC/776/2025**

DIPA MAHESH BHOI ..Patitioner Appellance
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD Through in branch manager
Opposite Party/Respondent

**Opposite Party/Respondent Name:**

1.DNYA MULTISTATE CO OF CREDIAT SOCIETY LTD THROUGH ITS BRANCH MANAGER DNYANARADHA BHAVAN JALNA ROAD, BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-411122
2.YASHWANT VASANTARAO KULKARNI THROUGH DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD DNYANARADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED BELD ATP DISTRICT JAIL HEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-431122
3.SUSHIL SHRIRAM HADULE THROUGH ITS DINY ANARADHA MULTISTATE CO-OP CREDIAT SOCIETY LTD DNYANARADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED BEED, MAHARASHTRA BEED-431122
4.DNYANARADHA MULTISTATE CO OF CREDIAT SOCIETY LTD THROUGH ITS BRANCH MANAGER MONDHA ROAD, GEORAI TO GEORAL DIST BEED, MAHARASHTRA BEED-431127

### जाहिर प्रगटन

नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमूद कार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही। पल्ला बदन आलयामुळे मिळून येत नाही म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या आहिर नोटीम व्दारे आपणाम कळविण्यात येते की, विगा पक्ष यांनी वर नमूद का बायोगाच्या पत्यावर दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता, अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपना लेखी जयाव, पुरावा व प्रतिज्ञानेव दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतफ आदेश पारित करणेत येवन पूवीन कार्यवाही करण्यात येईन माची दखल प्यावी

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीर यांची आदेशानुमार

दिनांक ०५/०३/२०२६ ठिकाण बीड स्वाक्षरीत

**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

# जिल्हा परिषदेचा मार्च एंड जोरात सुरू

## मागच्या काळातील न दिलेली बिलेही देण्याचा सपाटा चालू

बीड । प्रतिनिधी

मार्च एंडच्या काळामध्ये सर्व निधी खर्च करण्याच्या सूचना शासनाच्या असल्याने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला तसेच इतर विभागाला आलेला निधी खर्च करण्याचे काम जोरात सुरू असून गेल्या अनेक दिवसापासून रोखलेली बिलेही देण्याचा सपाटा सध्या सुरू आहे. बीड जिल्ह्यामध्ये बांधकाम विभागासह इतर विभागातही अनेक कामे अपूर्ण आहेत. मात्र अपूर्ण कामाची बिले ही देण्याचा सपाटा जिल्हा परिषदेमध्ये सुरू असून




मार्चला सर्व पैसा खर्च करण्याच्या तयारी मध्ये जिल्हा परिषद प्रशासन आहे. जर हा निधी गुत्तेदारांना वितरित झाला तर तेअपूर्ण कामे पूर्ण करतील काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिल्हा परिषदेला जो निधी दिला जातो तो एक वर्षासाठी दिला जातो. हा निधी मार्च पूर्वी खर्च होणे गरजेचे असते. मात्र जिल्हा परिषदेमधून काम करणारे गुत्तेदार आणि पुरवठादार अकरा महिने झोपा काढतात .आणि मार्चमध्ये मग थातूरमातूर कामे करून बिले उकळण्याचा प्रयत्न करतात. घाई असल्याने अधिकारी फारसे न पाहता ही बीले देण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक पाहता ११ महिने कामे पूर्ण करून यापूर्वीच बिले देणे गरजेचे असते. शासनाकडे निधी नसेल तर बिल थकणे ही वेगळी गोष्ट आहे. मात्र पैसे असतानाही गुत्तेदारही ११ महिने कामे करत नाहीत. आणि ऐनवेळी मग घाई करतात. यात अनेकांची कामे अपूर्ण असतात. मात्र तरीही हे गुत्तेदार थातूरमातूर कामे करून एम. बी. तयार करून बिले उचलण्याचा तयारीत असतात. शासनाने नियुक्त केलेले अभियंते आणि ज्या ज्या ऑथॉरिटीकडे कामे पूर्ण झाल्याची माहिती घेऊन त्याची एमबी तयार करण्याचे अधिकार आहेत. ◀◀ पान ३ वर

### दलित वस्तीची बिले काढण्याचा सपाटा

दलित वस्तीची कामे ही मुख्यत: ग्रामपंचायतचे सरपंच ,स्थानिक पुढारी यांच्या मार्फतच केली जातात. वर्षभर काम न करता शेवटी बिले काढण्याचा सपाटा चालू असून थातूरमातूर कामे करून हे पैसे लाटण्याचा सर्वच पुढारी प्रयत्न करत आहेत. त्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये सकाळपासूनच खेटे घालण्याचे काम हे पुढारी करत असून अधिकाऱ्यावर दबाव आणून किंवा चिरीमिरी देऊन आपले बिल कसे काढता येईल यासाठी जिवाचा आटापिटा करीत आहेत. अशा लोकांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीच रोखले पाहीजे अशी सर्व सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

# एजाजभाई देशमुख यांच्या परिवाराला मदतीचा हात गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानकडून पाच लाखाची मदत

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा सर्व धर्मियांशी असलेला जिव्हाळा पुन्हा एकदा दिसून आला. भाजपचे दिवंगत नेते एजाजभाई देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवाराला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या पाच लाख रूपयांची मदत त्यांनी जाहीर केली, एवढेच नव्हे तर मुस्लिम समाजातील दरवर्षी तीन गरीब मुलींना वैद्यकीय शिक्षणासाठी हातभार लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

भाजपच्या अल्पसंख्यांक मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष दिवंगत एजाज देशमुख यांचे नुकतेच निधन झाले, काल शहरात झालेल्या



शोकसभेत ना. पंकजाताई मुंडे यांनी एजाजभाई यांच्या कुटुंबियांच्या पाठिशी आपण खंबीरपणे उभे असल्याचे सांगत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, एजाजभाई हे मुंडे साहेबांचे अत्यंत लाडके कार्यकर्ते होते. अल्पसंख्यांक आघाडीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या वाढीसाठी त्यांनी अविस्मरणीय योगदान दिले. अत्यंत शांत आणि सतत चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवणारे तळमळीचे कार्यकर्ते अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या जाण्याने आपण मुंडे साहेबांच्या शिकवणीवर चालणारा सक्रिय कार्यकर्ता गमावला आहे. एजाज या नावाचा अर्थ अद्भूत सन्मान असा होतो. त्यांच्या पश्चात त्यांच्या परिवाराला आधार देण्याची गरज ओळखून गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाख रूपयांची मदत देते. याशिवाय मुस्लिम समाजातील गरीब, गरजू व वंचित मुलींना वैद्यकीय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना त्यांनी जाहीर करून दरवर्षी तीन मुलींना यासाठी मदत करणार असल्याचे त्या म्हणाल्या. शोकसभेस राष्ट्रीय नेते जमाल सिद्दिकी, आ. संजय केणेकर, योगेश क्षीरसागर, सलीम जहांगीर, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, इद्रीस मुलतानी आदींसह असंख्य मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# स्वामी आनंद स्वरूप यांच्या वक्तव्याविरोधात विवेक विचार मंचचे निवेदन

## अ‍ॅड.प्रबोधन निकाळजे यांनी केली कठोर कारवाईची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

स्वामी आनंद स्वरूप यांनी केलेल्या आक्षेपार्ह व संविधानविरोधी वक्तव्याविरोधात आष्टी तहसील कार्यालयात निवेदन देऊन कठोर कायदेशीर कारवाईची मागणी विवेक विचार मंच चे विभाग संयोजक अ‍ॅड. प्रबोधन निकाळजे यांनी केली. हे निवेदन तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांना सादर करण्यात आले व ते नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर साहेब यांनी स्वीकारून त्यात योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



निवेदनात म्हटले आहे की, नाशिक येथील अशोक खरात याच्या प्रकरणावर बोलताना स्वामी आनंद स्वरूप यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच अनुसूचित जाती समाजाबद्दल अत्यंत अपमानास्पद व असंवैधानिक विधान केले आहे. तसेच त्यांनी मनुस्मृती व चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे समर्थन करत भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारी भूमिका मांडल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही वक्तव्ये समाजात तेढ निर्माण करणारी असून अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ अंतर्गत गंभीर गुन्हा ठरतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समतेच्या व न्यायाच्या मूल्यांवर होणारे असे हल्ले निंदनीय असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध अट्रॉसिटी कायद्याअंतर्गत तात्काळ व कठोर कारवाई करावी, तसेच समाजात द्वेष पसरवणाऱ्या व संविधानविरोधी ◀◀ पान ३ वर

# अंबाजोगाई येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निवेदन सादर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आज अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण निवेदन सादर करण्यात आले. जिल्ह्यात वाढत असलेल्या अंधश्रद्धा, भोंदूगिरी व जादूटोणा प्रकरणांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली.

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, देवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष किंवा अध्यात्माच्या नावाखाली अनेक ठिकाणी लोकांची आर्थिक फसवणूक तसेच मानसिक छळ



होत असून काही प्रकरणांमध्ये महिलांचे शोषणही होत आहे. यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण होत असून अंधश्रद्धेला खतपाणी मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा' प्रभावीपणे राबविण्याची मागणी करण्यात आली. प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करून त्याची माहिती जाहीर करावी, तसेच गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील, ग्रामविकास अधिकारी, आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच, वैज्ञानिक ◀◀ पान ३ वर

## छत्रपती संभाजीनगर येथील युवा सेनेच्या बैठकीस पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे – विपुल पिंगळे

बीड । प्रतिनिधी



शनिवार दिनांक २८ मार्च २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर (एनराईज बाय सयाजी) येथे होणाऱ्या महाराष्ट्र युवा संघटन दौऱ्यानिमित्त युवासेना कार्याध्यक्ष मा.श्री. पूर्वेश सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे, युवासेना सचिव किरण साळी यांच्या प्रमुख उपस्थिती मधे मराठवाड्यातील संघटन अधिक बळकट करण्यासाठी महत्वपूर्ण विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, जालना आणि हिंगोली या सर्व जिल्ह्यांतील युवासेना पदाधिकारी व युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. युवासेनेचे संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून,बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व युवासैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडचे प्रमोद क्षीरसागर यांची पुणे ग्रामीण एलसीबीला बदली

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील पेठ बीड भागातील रहिवाशी असलेले प्रमोद क्षीरसागर यांची पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या (एलसीबी ) पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक २६ मार्च रोजी त्यांनी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीने बीड जिल्ह्याची मान स्वाभिमानाने उंचावली असून पेठ बीड भागातील व बीड शहरातील मित्रपरिवार व नातेवाईकांनी



प्रमोद क्षीरसागर यांचे अभिनंदन केले असून प्रसिद्ध सीताई कन्स्ट्रक्शनचे संचालक श्याम क्षीरसागर, पप्पू क्षीरसागर तसेच रणजीत क्षीरसागर यांचे ते बंधू आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलीस निरीक्षक पदी बीडचे भूमिपुत्र प्रमोद क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी प्रमोद क्षीरसागर यांनी नवी मुंबई येथील पनवेल पोलीस स्टेशन पुणे पिंपरी चिंचवड भागातील हिंजवडी, वाकड, चतुर्शिंगी ,तळेगाव दाभाडे ,चाकण, आळेफाटा, शिक्रापूर या पोलीस स्टेशनला अतिशय उत्कृष्ट काम केलेलं असून विविध आव्हानात्मक ◀◀ पान ३ वर

# रोटरीने लावलेल्या झाडांना आता सात दिवसाला पाणी

## तहानलेल्या झाडांसाठी पांडुरंग आला धावून!

माजलगाव ( प्रतिनिधी )

यंदाच्या तीव्र उन्हाळ्याची चाहूल फेब्रुवारी महिन्यापासूनच लागली होती. नेहमीपेक्षा यावर्षी मार्च महिन्यातच कडक उन्हाची तीव्रता वाढल्याने शहरातील वृक्षसंवर्धनासाठी मोठे आव्हान उभे राहिले आहे. एप्रिल व मे हे आणखी दोन महिने अति तीव्र उष्णतेचे बाकी असताना, या कडक उन्हात शहरातील नव्याने वाढत असलेल्या झाडांना जिवंत ठेवणे ही रोटरी साठी मोठी जबाबदारी बनली आहे.

अशा वेळी रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल अंतर्गत हरित माजलगाव मोहिमेत शहरात लावलेल्या झाडांसाठी शहरातील सिमेंट व्यावसायिक पांडुरंग चांडक हे अक्षरशः देवदूत ठरत आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून ते आपल्या टेम्पोमध्ये १००० लिटर क्षमतेची



पाण्याची टाकी ठेवून सुमारे ५०० झाडांना दर आठ-दहा दिवसांनी तब्बल दहा हजार लिटर पाणी देत होते. मात्र, उन्हाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन आता त्यांनी या झाडांना दर सात दिवसांनी पाणी देण्याचा संकल्प केला आहे.दि २६ मार्च गुरुवार रोजी श्रीरामनवमी निमित्त त्यांनी स्वतः उपस्थित राहून सर्व झाडांना पाणी देण्याचे काम करून घेतले. त्यामुळे तहानलेल्या झाडांसाठी त्यांच्या रूपाने जणू प्रत्यक्ष पांडुरंगच धावून आला, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन रोटरी वर्षांमध्ये रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलने शहराच्या मुख्य रस्त्यांच्या मधोमध हरित माजलगाव उपक्रमांतर्गत दोन टप्प्यांत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले. विशेष म्हणजे, आज या झाडांचे १०० टक्के संगोपन, वाढ आणि संवर्धन करण्यात रोटरीला उल्लेखनीय यश मिळाले आहे. जसजशी ही झाडे वाढू लागली,

# परळीत ना. पंकजाताई मुंडे यांचा हाऊसफुल्ल जनता दरबार

## जनतेच्या समस्यांचा तात्काळ निपटारा; प्रशासनाला दिल्या जागेवर सूचना

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे जनता दरबार आयोजित केला होता. या जनता दरबारात परळी मतदारसंघ व तालुक्यातील आलेल्या शेकडो नागरिकांच्या समस्या त्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतल्या आणि अनेक प्रलंबित कामांना तात्काळ मार्गी लावले.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जागेवर प्रश्नांचा निपटारा



केला. जनतेचे प्रश्न सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. सामान्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.

**नागरिक सुखावले**

आपल्या लाडक्या नेत्या थेट जनतेत मिसळून संवाद साधत असल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते. ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं आणि कामाचा शब्द दिला, आता आमचा प्रश्न सुटेल, अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबाराला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# चिंचवण येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

## श्रीरामांचे आदर्श जीवनात अंगीकारा – अक्षय महाराज पिंगळे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवण येथे तांबडे कुटुंबीयांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून श्रीराम जन्मोत्सव सोहळा साजरा करण्याची परंपरा सुरू असून यावर्षीही हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

राम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी युवा कीर्तनकार अक्षय महाराज पिंगळे यांनी सांगितले की, श्रीराम जन्मोत्सव हा केवळ उत्सव नसून तो आपल्या जीवनाला दिशा देणारा अध्यात्मिक सोहळा आहे. प्रभू श्रीरामांचे आदर्श,आचरण सत्यनिष्ठा आणि कर्तव्यपरायणता प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारली पाहिजे. नामस्मरण आणि भक्तीभाव यामुळेच जीवनात खरे समाधान प्राप्त होते. अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकता, सद्भावना आणि संस्कारांची





जपणूक होते.

श्रीराम जन्माचे महत्त्व, आदर्श आणि भक्तीभाव यावर प्रभावी ◀◀ पान ३ वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अशोकनगर कार्यकारिणी जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सम्राट अशोक नगर माजलगाव येथील बुद्ध विहारांमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.





यावेळी ही कार्यकारिणी विजय दादा साळवे, अविनाश जावळे, राकेश दादा साळवे, ड. नंदकिशोर खळगे, सिद्धार्थ ससाने यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली असून या बैठकीस अशोक नगर येथील सामाजिक कार्यकर्ते तरुण मंडळी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती. जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी आनंद शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी अनिल भराटे कोषाध्यक्ष पदी रोहित भैय्या साळवे सचिव पदी सार्थक शिंदे प्रसिद्धी प्रमुख पदी पत्रकार पृथ्वीराज निर्मळ, संघटक नितीन प्रधान, सजावट प्रमुख नितीन जावळे सल्लागारपदी भारत तांगडे, बाबासाहेब सूर्यवंशी, मुंजाभाऊ वैराळे, श्रीहरी नाना भोजने, कांबळे सर, अशोक कांबळे, धोंडीराम ढालमारे, अमोल शेरकर, शत्रुघन कसबे, सिद्धार्थ खिल्लारे यांची नियुक्ती करण्यात आली असून हा जयंती उत्सव डीजे ला फाटा देत डीजे मुक्त करण्याचा महत्वपूर्ण ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.२८ मार्च २०२६ । पान ७

# खरात प्रकरणी चाकणकर फॅमिलीचे व्हिडिओ बाहेर आणा-रूपाली पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात एकच खळबळ उडालेली आहे. रूपाली ठोंबरे पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर खरात प्रकरणात अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. ठोंबरेंनी या प्रकरणात रूपाली चाकणकरांना सहआरोपी करून तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करताना सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि पीडित महिलांनी धक्कादायक माहिती समोर आणली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, खरातने पुणे येथील काही बड्या उद्योजकांना फसवल्याचे आणि अनेक महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणात मुख्य आरोपीला वाचवण्यासाठी मोठी 'तोडपाणी' (आर्थिक व्यवहार) झाल्याचा दावा केला जात आहे. सर्वात धक्कादायक आरोप हा आहे की, ज्या वेळी या घटना घडल्या, त्यावेळेस रुपाली चाकणकर आयोगाच्या अध्यक्ष होत्या आणि त्यांच्या संमतीनेच महिलांना 'पत्रिका तपासणी' किंवा 'समुपदेशन' करण्याच्या नावाखाली ठराविक ठिकाणी पाठवले जात होते.

या प्रकरणातील पीडित महिलांनी असा दावा केला आहे की, त्यांचे अश्लील व्हिडीओ बनवून त्यांना ब्लॅकमेल केले जात आहे. रोज एका नवीन महिलेचा व्हिडीओ बाहेर येत आहे. जर सुरुवातीलाच यावर कारवाई झाली असती, तर आज १५० पेक्षा जास्त महिलांचे शोषण झाले नसते, असे ठोंबरे यांनी म्हटले आहे. या व्हिडीओ क्लिप्स आधी पोलिसांकडे जाण्याऐवजी दाबण्याचा प्रयत्न झाला आणि खरात नावाच्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होऊ नये म्हणून चाकणकर यांनी मध्यस्थी केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकरणात आता उ्छ- टेस्टचे सत्र सुरू झाल्याने अनेक महिलांच्या कौटुंबिक जीवनात वादळ निर्माण झाले आहे. माझ्याकडे अनेक महिला येत आहेत, त्यांना मी रीतसर तक्रार करायला सांगितली आहे. मात्र, महिलांची मानसिक तयारी झाल्याशिवाय मी त्यांना फोर्स करणे योग्य नाही, असेही रूपाली ठोंबरे यांनी स्पष्ट केले. या संपूर्ण प्रकरणात रुपाली चाकणकर किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे धागेदोरे आहेत का? याची सखोल चौकशी करून त्यांचेही व्हिडीओ समोर आणावेत, अशी मागणी विरोधकांकडून आणि पीडितांकडून केली जात आहे. या आरोपामुळे आता राज्य महिला आयोगाची प्रतिमा डागाळली असून, पोलीस प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गाठ ऐवजी गर्भाशय काढणाऱ्यांना डॉक्टरांना न्यायालयाचा दणका; मांजरीतील ४ डॉक्टरांसह ५ जणांचा अटकपूर्व फेटाळला

**पुणे । प्रतिनिधी**

गर्भाशयातील गाठ काढण्यासाठी आलेल्या महिलेची पूर्वसंमती न घेता संपूर्ण गर्भायशाची पिशवी काढणाऱ्या चार डॉक्टरांसह ५ जणांना न्यायालयाने दणका दिला आहे. अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुमित जोशी यांनी फेटाळला.

मांजरी बुद्रुक येथील 'साई केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये १५ सप्टेंबर २०२५ रोजी घडलेल्या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली होती.






या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे ड. विश्वास सातपुते यांनी बाजू मांडली. डॉ. संदीप कराड, डॉ. मंदार साहुजी, डॉ. निहाल शेख, डॉ. शेहजाद शेख, सुरज कांबळे अशी अटकपूर्व फेटाळलेल्यांची नावे आहेत. केशवनगर भागात राहणाऱ्या एका ३५ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार मांजरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्या ब्युटी पार्लर चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. २०२३ मध्ये सोनोग्राफी दरम्यान त्यांच्या गर्भाशयात एक छोटी गाठ असल्याचे निदान झाले होते. पुढील उपचार आणि माहितीसाठी त्यांनी १३ सप्टेंबर २०२५ रोजी मांजरी येथील 'साई केअर हॉस्पिटल'ला भेट दिली होती. त्यावेळी ही घटना घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी ५ जणांनी अटकपूर्व साठी अर्ज केला होता. यास सरकारी वकील विश्वास सातपुते यांनी विरोध् केला. दाखल गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. काढलेल्या गर्भायशाचे काय केले आहे. गर्भायश तस्करी केली आहे का, हा गुन्हा करण्याचा उद्देश काय आहे, त्या महिलेवर उपचार करताना निष्काळजीपणा केल्याचा अभिप्राय बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने दिला आहे. त्यामुळे सर्वांना अटक होऊन तपास होणे आवश्यक आहे. त्यामुळे अटकपूर्व जामीन फेटाळण्याची मागणी ड. सातपुते यांनी केली.

# एम्प्रेस गार्डनच्या जागा हस्तांतरणाला विरोध; हरित वारशाच्या रक्षणासाठी जनआंदोलन उभारण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

एम्प्रेस बोटॅनिकल गार्डनची सुमारे एक एकर जागा न्यायालयीन इमारतीसाठी हस्तांतरित करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयास 'दि ग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया'ने विरोध दर्शवला आहे. विविध सामाजिक संस्था आणि पर्यावरणप्रेमींनी या हरित वारशाच्या रक्षणासाठी जनआंदोलन उभारावे, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे.

या संदर्भात संस्थेचे अध्यक्ष प्रताप पवार आणि मानद सचिव सुरेश पिंगळे यांनी शुक्रवारी (ता. २७) पत्रकार परिषदेत माहिती दिली. ''शहरात सिमेंट-काँक्रिटीकरण झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील हा हरित पट्टा नष्ट झाल्यास पर्यावरणावर दूरगामी परिणाम होतील. शहरातील अनेक सरकारी जागांवर अतिक्रमण झाले आहे. तेथील नागरिकांचे पुनर्वसन करून पर्यायी जागा सरकारने इमारतीसाठी उपलब्ध करून द्यावी. ज्या संस्थांकडून उद्यानाचे संवर्धन करून पर्यावरण जपले जाते, त्यांचे कौतुक करणे दूरच, त्यांना अडचणीत आणले जात आहे,'' अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.




संस्थेमार्फत १८९२ पासून, म्हणजेच तब्बल १३४ वर्षांपासून या उद्यानाचे जतन केले जात आहे. उद्योगपती शंतनूराव किर्लोस्कर आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पुढाकारातून या उद्यानाचा विकास झाला. ज्येष्ठ उद्योगपती आणि लोकसहभागातून ३५ ते ४० कोटी रुपये खर्च करून हा हरित वारसा जपण्यात आला आहे. या उद्यानात ब्रिटिश काळात सेंट्रल अमेरिका आणि आफ्रिकेतून आणलेल्या शेकडो दुर्मिळ वृक्ष आणि वेलींचे संवर्धन करण्यात आले आहे.

संबंधित जागेवर भविष्यात 'जैवविविधता पार्क' उभारण्याच्या दृष्टीने शेकडो वृक्षांची लागवडही केली आहे. अशा परिस्थितीत ही जागा बांधकामासाठी दिल्यास नैसर्गिक परिसंस्था नष्ट होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. जागा हस्तांतरण प्रक्रियेला सुरुवात झाल्यापासून संस्थेने वारंवार आंदोलने, निवेदने देत निषेध नोंदविला. मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे त्यांनी नमूद केले.महसूल व वन विभागामार्फत एम्प्रेस गार्डनसाठी ३७ एकर शासकीय जागा भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. यासंदर्भात सुमारे एक वर्षापूर्वी नव्याने करारही करण्यात आला. मात्र, त्यानंतर राज्य सरकारने या जागेपैकी चार हजार चौरस मीटर क्षेत्र (सुमारे एक एकर) क्षेत्र लष्कर न्यायालयाच्या इमारतीसाठी देण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे.

# पत्नीला देवदर्शनासाठी कर्नाटकला नेलं, कारमधून ओढून रस्त्यावर गळा चिरला, नंतर कारखाली चिरडलं; बारामतीतील आरोपी अटकेत

**बारामती । प्रतिनिधी**

कर्नाटकातील कलबुर्गी (घरश्ररलींरसळ) जिल्ह्यात मानवतेला काळिमा फासणारी एक थरारक घटना उघडकीस आली आहे. बारामती येथील अक्षय आणि शैला हे दाम्पत्य देवदर्शनासाठी गाणगापूरला गेले असताना त्यांच्यात किरकोळ वादाचा प्रकार घडला. त्यानंतर संतापाच्या भरात अक्षयने पत्नी शैलावर केलेल्या अमानुष अत्याचारामुळे तिचा जागीच मृत्यू झाला.




मिळालेल्या माहितीनुसार, एका किरकोळ कारणावरून रस्त्यात झालेल्या वादानंतर अक्षयने पत्नी शैलाला कारमधून ओढून बाहेर काढत तिच्यावर लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडीओ स्थानिकांनी मोबाईलमध्ये कैद केला असून तो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. पत्नीचा राग आल्यानंतर पतीने तिला कारमधून बाहेर ओढत मारहाण केली. तिला लाथा-बुक्क्यांनी अमानुषपणे मारहाण केली. या मारहाणीनंतरही आरोपीचा संताप शांत झाला नाही. त्याने धारदार शस्त्राने पत्नीचा गळा चिरला. इतकंच नाही, तर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पत्नीवरून कार चालवत तिला चिरडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अमानुष कृत्यात शैलाचा जागीच मृत्यू झाला.या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, महिला मदतीसाठी तडफडत असताना घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी मदतीसाठी पुढे न येता व्हिडीओ शूट करण्यावर भर दिला. अनेक गाड्या त्या ठिकाणाहून जात होत्या. तर घटनेच्या ठिकाणी अनेक लोक उपस्थित होते. असं असतानाही कुणीही तिच्या मदतीला धावून आले नाही, ही बाब समाजमनाला अस्वस्थ करणारी आहे. घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी अक्षयला अटक केली आहे. ही हत्या पूर्वनियोजित होती का याचा तपास सुरू असून पोलिसांकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे.

# भारती विद्यापीठ भागात हॉटेलमध्ये गॅस गळतीमुळे भडका; चारजण जखमी

**कात्रज । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ परिसरातील एका हॉटेलमध्ये गॅस गळतीमुळे अचानक भडका उडाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत चार जण किरकोळ जखमी झाले असून हॉटेलचे किरकोळ नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे हॉटेल सकाळी व संध्याकाळी सुरू असते. सायंकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास कामगारांनी हॉटेल उघडले असता गॅसचा तीव्र वास येत होता.



तसेच गॅस प्रेशरचा आवाजही ऐकू येत होता. परिस्थिती लक्षात घेऊन कामगारांनी तात्काळ लाईट बंद केली. मात्र काही क्षणांतच गॅसचा भडका उडून आग लागली. घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या आगीत हॉटेलमधील पीयुसी शीट कोसळली, खिडक्यांच्या काचा फुटल्या आणि परिसरात एकच खळबळ उडाली. हॉटेलमध्ये व्यावसायिक वापरासाठीचे दोन १९ किलोचे गॅस सिलेंडर होते. घटनेची माहिती मिळताच कात्रज अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. कात्रज अग्निशमन केंद्राचे प्रमुख प्रदीप खेडेकर यांनी सांगितले की, गॅस गळतीमुळे भडका उडून ही घटना घडली असून चार कामगार हात पायाला भाजून किरकोळ जखमी झाले आहेत. अग्निशमन जवान पोहचले त्यावेळी कोठेही आग लागलेली आढळली नाही. या वेळी उप अग्निशमन अधिकारी संतोष भिलारे तसेच फायरमन किरण पाटील, मयूर काटे, लियाकत मुजावर हे उपस्थित होते.

# पिस्तूलचा धाक दाखवत ३२ वर्षीय महिलेवर अत्याचार, धक्कादायक घटनेनं दौंड हादरलं, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**बारामती । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. कुरकुंभ परिसरात एका ३२ वर्षीय महिलेवर जबरदस्तीने अत्याचार करण्यात आला आहे. यासंदर्भात दौंड पोलीस ठाण्यामध्ये पीडित महिलेच्या तक्रारीवरुन आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. २५ मार्च २०२६ रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मुकादमवाडी कुरकुंभ हद्दीत हा संपूर्ण प्रकार घडला आहे. पिस्तूलचा धाक दाखवत महिलेवर अत्याचार करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.





आरोपीने संबंधित महिलेला लिफ्ट देण्याचा बहाना केला आणि त्यानंतर तिला पिस्तुलचा धाक दाखवत तिच्यावरती अत्याचार केल्याची तक्रार दौंड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दौंड पोलिसांनी खडकी येथील संशयित आरोपी अमोल साहेबराव काळे याला बेड्या ठोकल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस करत आहेत.

# मंचर येथे प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांना दोन लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले; एसीबीची कारवाई

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव-जुन्नर विभागाचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांना दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पुणे पथकाने शुक्रवारी (ता. २७) दुपारी मंचर येथील प्रांत कार्यालयात रंगेहात पकडले. या घटनेमुळे आंबेगाव जुन्नर तालुक्यात तालुक्यात खळबळ उडाली आहे.



याबाबत लाचलोजपत प्रतिबंधक विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त दयानंद गावडे यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात नमूद केले आहे की, 'तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून, नारायणगाव (पुणे-नाशिक महामार्ग) परिसरात संयुक्त भागीदारीत सुरू असलेल्या प्रकल्पासाठी अंशतः पूर्णत्व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केला होता. संबंधित इमारतीचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून आवश्यक शासकीय परवानग्या व ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्याची जबाबदारी तक्रारदारांकडे होती. या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करत असताना शुक्रवारी (ता. २०) रोजी गोविंद शिंदे यांनी अंशतः पूर्णत्व प्रमाणपत्र मंजूर करून देण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रारदारांनी मंगळवारी (ता. २४) रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार लुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी पडताळणी कारवाई केली असता आरोपी अधिकाऱ्याने दोन लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा रचून दुपारी ३:०३ वाजता मंचर येथील उपविभागीय कार्यालयात तक्रारदाराकडून दोन लाख रुपये स्वीकारताना शिंदे यांना रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया पुणे लाच लुचपत प्रतिबंध विभागाचे पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे व पोलीस निरीक्षक प्रवीण निंबाळकर यांनी सुरू केलीआहे.

# दौंडमध्ये मध्यरात्री धडक कारवाई; बेकायदेशीर पिस्तुलसह दोघे जेरबंद

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड शहरात बेकायदेशीररीत्या पिस्तूल बाळगणाऱ्या सराईतांवर पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (डउइ) मोठी कारवाई केली आहे. हुतात्मा चौक रेल्वे ग्राउंड रोडवर गुरुवारी मध्यरात्री टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी ८० हजार रुपये किमतीच्या पिस्तुलसह दोन आरोपींना अटक केली आहे, तर त्यांचा एक साथीदार पसार झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. २६ मार्च) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास काही तरुण विनापरवाना घातक शस्त्र घेऊन हुतात्मा चौक परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेने दौंड पोलिसांच्या मदतीने परिसरात सापळा रचला. संशयास्पद हालचाली दिसताच पोलिसांनी झडती घेतली असता, त्यांच्याकडे स्टीलची बॉडी असलेले मॅक्झिनसह पिस्तूल मिळून आले. इरफान उर्फ शेरखान शब्बीर खान (वय २२, रा. कुंभार गल्ली, दौंड) आणि विशाल प्रकाश काटकर (वय ३०, रा. कुंभार गल्ली, दौंड) या दोघांना पोलिसांनी अटक केली, तर सोनू उर्फ बिल्ला उर्फ पद्माकर शांताराम ताडे (रा. कुंभार गल्ली, दौंड) हा पसार झाला. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार आसिफ नबीलाल शेख यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार दौंड पोलीस ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या पिस्तुलाचा किंमत सुमारे ८० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार आसिफ शेख, सचिन घाडगे, पोलीस हवालदार योगेश नागरगोजे, अजित भुजबळ आणि दौंड पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक रुपेश कदम, किरण राऊत, सुभाष राऊत, अमीर शेख व अक्षय कुंभार यांच्या पथकाने केली आहे.

# व्हीआयटीचा 'ई-समिट पुणे २६' उत्साहात संपन्न; उद्यमशीलतेला नवी दिशा

**पुणे । प्रतिनिधी**

विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी) येथील 'इंटरप्रेन्योरशिप डेव्हलपमेंट सेल' (व्हीईडीसी)तर्फे आयोजित 'ई-समिट पुणे २६' हा उद्यमशीलता महोत्सव १७ ते २४ मार्चदरम्यान उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेची जाणीव निर्माण करून त्यांना उद्योगजगताशी जोडणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. व्हीआयटीच्या इतिहासातील हा सर्वात मोठा आणि भव्य उद्यमशीलता महोत्सव ठरला.



महोत्सवाची सुरुवात १७ मार्च रोजी 'स्टार्टअप शोकेस'ने झाली. या उपक्रमात विविध स्टार्टअप्सनी आपले व्यवसाय मॉडेल्स आणि नवकल्पना सादर केल्या. १८ मार्च रोजी 'पिच परफेक्ट' तर २० व २१ मार्च रोजी 'बोर्डरूम' स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी सादरीकरण कौशल्य, उद्यमशील विचारसरणी आणि निर्णयक्षमता प्रभावीपणे सादर केली.

२३ मार्च रोजी झालेल्या 'ई-टॉक्स' या विशेष सत्रात महाराष्ट्र राज्य भाजपा युवा आघाडीचे अध्यक्ष, रेसिंग चॅम्पियन व उद्योजक कृष्णराज महाडिक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेसोबतच देशभक्तीची भावना जागृत केली. या सत्रात क्विक हील टेक्नॉलॉजीजचे सहसंस्थापक डॉ. संजय काटकर, ट्रायडंट गेमिंगचे संस्थापक अभिजीत 'घातक' अंधारे, स्टार्टअप स्ट्रॅटेजिस्ट व वन कॅपिटल लिमिटेडचे संस्थापक खालिद वानी तसेच बिझनेस लीडर मधु सुदन यांनी आपले अनुभव मांडत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिवसाचा समारोप शुभांकर सलील कुलकर्णी यांच्या 'टेल ऑफ मेलोडीज' या बँडच्या सादरीकरणाने झाला. २४ मार्च रोजी 'समिट शोडाऊन' या समारोप सोहळ्यात विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर दिशा काटकर यांच्या उपस्थितीने कार्यक्रमात रंगत आली, तर सौरभ भोसले यांच्या स्टँड-अप कॉमेडीने प्रेक्षकांना खळखळून हसवले. 'फ्यूज सिटी' या बँडच्या दमदार सादरीकरणाने महोत्सवाचा उत्साहपूर्ण समारोप झाला. या संपूर्ण महोत्सवाने विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेची नवी ऊर्जा निर्माण करत भविष्यातील उद्योगजगतासाठी सक्षम पिढी घडवण्याचा संदेश दिला.